रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक ३० । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
www.krushival.in

## लोणेरेच्या लाचखोर अधिकाऱ्यास अटक



**माणगाव :** ठेकेदाराचे बिल अदा करण्यासाठी त्याच्याकडून लाचेची मागणी करत ती स्वीकारत असताना रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून वित्त अधिकाऱ्याला रंगेहाथ पकडले. सविस्तर हकीकत अशी की, तक्रारदार सागर सुरेश जाधव (३२, रा. लोणेरे) यांनी लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या पदविका विभागातील सभागृह नूतनीकरणाचे काम केले होते. या कामाचे बिल मंजूर करून ते अदा करण्यासाठी विद्यापीठातील वित्त अधिकारी ओंकार रामचंद्र आंबपकर (५५, रा. आनंदनगर सोसायटी, लोणेरे) याने सागर जाधव पान २ वर


कृषीवल
रायगड, शनिवार, दि. ६ जुलै २०२४
किंमत ४ ₹




# ऑगस्टमध्ये पंचायत निवडणुका?

। प्रमोद जाधव ।
। अलिबाग ।

**लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकांचे वेध लागले असतानाच मुदत संपलेल्या रायगड जिल्ह्यातील २४० ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे बिगूल ऑगस्ट महिन्यात वाजण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोगाने प्रभागनिहाय प्रारुप मतदारयादी प्रसिद्ध करण्याचा कार्यक्रम जाहीर केला असून, ९ ते १९ जुलैदरम्यान ही प्रक्रिया पूर्ण होणार आहे. त्यासाठी प्रशासन कामाला लागले आहे. दरम्यान, सरपंच आणि सदस्य होण्याचे स्वप्न पाहणारे ग्रामपातळीवरील नेते आणि कार्यकर्त्यांना ग्रामपंचायत निवडणुकीचे वेध लागले असून, त्यांनी जोरदार तयारीही केली आहे.**




## जिल्ह्यातील २४० ग्रामपंचायतींचा समावेश

जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींचा कारभार गेल्या अनेक महिन्यांपासून प्रशासनाद्वारे चालवला जात आहे. त्यामुळे गावांतील विकासावर त्याचा परिणाम होत असल्याची चर्चा जोरात सुरु आहे. खड्डेमय रस्त्यांची दुरुस्ती व अन्य सुविधा पुरविताना प्रशासन कमी पडत असल्याचेही बोलले जात आहे. प्रशासन राज असलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेण्याच्या हालचाली सुरू झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

नुकतीच लोकसभा निवडणूक पार पडली. या नंतर विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम कधी जाहीर होणार याकडे लक्ष लागून राहिले होते. आता पावसाळा सुरू असतानाच ग्रामपंचायत निवडणुकांचे वेध लागले आहेत. दरम्यान, ग्रामपंचायत निवडणुका यापूर्वी लागण्याची चर्चा जोरात रंगली होती. अखेर राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायतीच्या मतदारयाद्यांचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील ३४, मुरूडमधील चार, पेणमधील १८, पनवेलमधील १५, उरणमधील आठ, कर्जतमधील ३०, खालापूरमधील तीन, रोहामधील २६, सुधागडमधील सहा, माणगावमधील २१, तळामधील १८, महाडमधील ३०, श्रीवर्धनमधील १६ आणि म्हसळामधील ११ अशा एकूण २४० ग्रामपंचायतींच्या मतदारयाद्यांचा कार्यक्रम होणार आहे. त्यामध्ये प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी ९ जुलैला प्रसिद्ध करणे, त्यावर हरकती व सूचना १५ जुलैपर्यंत दाखल करणे, तसेच १९ जुलैला प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर ग्रामपंचायत निवडणुकांचा कार्यक्रम ऑगस्ट महिन्यात जाहीर होण्याची शक्यता आहे.

### निवडणुकांना मुहूर्त कधी?

**रायगड जिल्हा परिषदेसह जिल्ह्यातील पंचायत समिती आणि नगरपरिषद निवडणूक झाली नसल्याने तेथे प्रशासक राजवट लावण्यात आलेली आहे. गेल्या काही वर्षांत ग्रामपंचायत निवडणुकांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे गावा-गावांतील नेते आणि कार्यकर्त्यांनी सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य होण्यासाठी आधीपासून सुरुवात केलेली आहे.**

## नेते, कार्यकर्त्यांना निवडणुकीचे वेध

### तालुकानिहाय ग्रामपंचायती

**अलिबाग :** चेंढरे, वरसोली, थळ, मापगाव, सातिर्जे, आगरसुरे, झिराड, धोकवडे, सारळ, रांजणखार डावली, रेवस, चरी, कुरकुंडी कोलटेंभी, शहापूर, आंबेपूर, पोयनाड, कुसुंबळे, कुर्डूस, ताडवागळे, कुरुळ, बेलकडे, ढवर, कावीर, बामणगाव, सहाण, बेलोशी, चिंचोटी, बोरघर, रामराज, सुडकोली, वरंडे, चौल.

**मुरूड :** उसरोली, मजगाव, आंबोली, सावली.

**पेण :** गागोदे खुर्द, करंबेळी, कासू, अंतोरे, जावळी, पाबळ, वरेदी, बेणसे, शिहू, कुहिरे, झोतीरपाडा, वढाव, शिर्की, उंबर्डे, कांदळे, रावे, शेंडोशी, जिर्णे.

**पनवेल :** गव्हाण, नांदगाव, पोयंजे, वांगणी तर्फे वाजे, आदई, वावंजे, शिरवली, कुंडेवहाळ, चिपळे, कर्नाळा, कराडे खुर्द, चावणे, जांभिवली, पारगाव, पळस्पे.

पान २ वर

## विधानपरिषद निवडणूक

# कोणाचीच माघार नाही

। मुंबई । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यातील बदलत्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर येत्या १२ जुलैला विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी निवडणूक होत आहे. या ११ जागांसाठी एकूण १२ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. शुक्रवारी विधानपरिषदेचे उमेदवारी अर्ज परत घेण्याचा शेवटचा दिवस होता. मात्र, उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या वेळ संपूनही कोणत्याही उमेदवाराने अर्ज मागे घेतलेला नाही. त्यामुळे आता येत्या १२ जुलैला विधिमंडळात मतदान पार पडणार आहे. गुप्त पद्धतीने मतदान असल्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक घोडेबाजार होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

विधानपरिषद निवडणुकीसाठी भाजपने एकूण पाच उमेदवार रिंगणात उतरवले आहेत. यामध्ये पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत, परिणय फुके, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे यांचा समावेश आहे. तर, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे हे दोघे मैदानात उतरले आहेत. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेकडून भावना गवळी आणि कृपाल तुमाने यांना विधानपरिषदेची उमेदवारी दिली आहे. तर, महाविकास आघाडीकडून शेकापचे जयंत पाटील, काँग्रेसच्या प्रज्ञा पान २ वर



### ११ जागांसाठी १२ उमेदवार रिंगणात

#### कुणाकडे किती संख्याबळ?

**महायुती**
भाजप -१०३ शिंदे सेना - ३७ राष्ट्रवादी (अजित पवार गट) - ३९ छोटे पक्ष-९ अपक्ष -१३ असे एकूण-२०१

**मविआ**
काँग्रेस - ३७ ठाकरे गट -१५ राष्ट्रवादी (शरद पवार गट)-१३ शेकाप -१ अपक्ष -१ असे एकूण -६७ एमआयएम -२, सपा -२, माकप - १, शेकाप -१ एकूण -६ आमदार तटस्थ आहेत.

आजचा अग्रलेख
शहिदांमध्ये भेदभाव

### वेधक

## नीट परीक्षा ११ ऑगस्टला

**नवी दिल्ली :** नीट पीजी २०२४ परीक्षेची नवीन तारीख आता जाहीर करण्यात आली आहे. ही परीक्षा आता ११ ऑगस्ट रोजी दोन सत्रामध्ये घेतली जाणार आहे. याबाबतची अधिसूचना एनबीईएमएसकडून जाहीर करण्यात आली आहे. यासंदर्भातील एक परिपत्रकही जारी करण्यात आले आहे. नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकल सायन्सने राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा नीट पीजी २०२४ या परीक्षेची तारीख जाहीर केली आहे. या परीक्षेसंदर्भातील अधिक माहिती उमेदवारांना अधिकृत वेबसाईट natboard.edu.in वर पाहता येणार आहे.

# अन्यथा जमिनी परत करा

## खारेपाटातील अन्यायग्रस्त शेतकऱ्यांची मागणी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

प्रकल्पातून रोजगार मिळवून देण्याचे आमिष दाखवून अलिबाग तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांच्या जमिनी भांडवलदारांनी कवडीमोल भावाने विकत घेतल्या. मात्र, ती जागा आजही प्रकल्पाविना ओसाड पडून आहे. मेढेखार व काळवड खार विभागातील शेतकऱ्यांना त्याचा फटका बसू लागला आहे. उपासमारीची वेळ या शेतकऱ्यांवर आली आहे. धूर्त भांडवलदारांकडून शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचा आरोप शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष पांडुरंग पाटील यांनी केला आहे. प्रकल्प उभारा, अन्यथा जमिनी परत करा, अशी मागणी होत आहे.

रायगड जिल्ह्याला भाताचे कोठार म्हणून ओळखले जात होते. विशेष म्हणजे, अलिबाग तालुक्यातील खारेपाट परिसरातील असंख्य शेतकरी भातशेतीवर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित होते. मात्र, येथील शेतकऱ्यांना प्रकल्पाच्या नावाने नोकरीचे आमिष दाखवून गेल्या काही वर्षांपूर्वी दलालाच्या मदतीने भांडवलदारांनी जमिनी विकत घेतल्या.

सुपिक, कसदार जमिनी भांडवलदारांना कवडीमोल भावाने विकल्या. शेतीला पूरक प्रकल्प उभारणार, शेतकऱ्यांच्या मुलांना नोकऱ्या, रोजगार देणार, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकास करणार असे स्वप्न त्यावेळी दाखविण्यात आले होते. शेतकऱ्यांची असहाय्यता, गरज आणि अज्ञानपणाचा फायदा घेत भांडवलदारांनी सुमारे ३७६ शेतकऱ्यांच्या १६२ हून अधिक हेक्टर जमिनी घेतल्या. पान २ वर

> **प्रकल्पाच्या नावाने भांडवलदारांनी जमीन विकत घेतली. मात्र, गेली अनेक वर्षे त्या जागेवर प्रकल्प उभा राहिला नाही. आज शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. शेतकरी देशोधडीला लागला आहे. शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी समाजक्रांती आघाडीच्या वतीने लढा सुरु केला आहे. मागील तीन महिन्यांपूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले होते. परंतु, अजूनपर्यंत प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे भविष्यात हा लढा तीव्र असणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे.**
> **- बी.जी. पाटील, अध्यक्ष,समाजक्रांती आघाडी महाराष्ट्र प्रदेश**

## एसटीला अपघात; १५ प्रवासी जखमी



**पनवेल :** मुंबई-गोवा महामार्गावर रत्नागिरीवरून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या एसटीचा पनवेल हद्दीतील शिरढोण गावाजवळ पहाटे भीषण अपघात झाला. हा अपघात एवढा भयानक होता की, एसटीमध्ये प्रवास करणारे १५ प्रवासी जखमी झाले आहेत. या सर्व जखमी प्रवाशांवर पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

रत्नागिरी-मुंबई ही एसटी मुंबई-गोवा महामार्गावरून गुरुवारी (दि.४) रात्री रत्नागिरीहून मुंबईकडे निघाली होती. ही एसटी पनवेल हद्दीतील शिरढोण गावाजवळ महामार्गावर पुठ्ठ्याने भरलेला पान २ वर

# ‘आरसीडीसी’चा बहिणींना दिलासा

- ✻ बँकेत उघडता येणार ‘झिरो बॅलन्स’ने खाते
- ✻ ‘लाडकी बहीण’ योजनेसाठी अभिनव योजना

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा व्यवसाय ६००० कोटीपर्यंत पोहोचला आहे. या यशस्वी वाटचालीत जिल्ह्यातील महिलांचा मोठा वाटा आहे. याकरिता बँकेच्या संचालक मंडळाने महाराष्ट्र राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना २०२४ चा लाभ घेण्यासाठी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने नवीन खाते शून्य रुपयात (झिरो बॅलन्सने) उघडण्याची अभिनव योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. रायगड जिल्हा सहकारी बँकेमध्ये महिला बचतगटांच्या माध्यमातून, तसेच ग्रामीण भागातील अनेक महिलांनी अनेक वर्षांपासून खाते उघडले असून, त्यांनादेखील या योजनेचा लाभ मिळवून देण्याकरिता बँकेच्या वतीने जिल्ह्यात कॅम्प आयोजित केले जाणार असल्याचे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी सांगितले.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांनी यावेळी बँकेच्या सर्व शाखांना याबाबत परिपत्रकाद्वारे या योजनेचा प्रचार आणि प्रसार करण्याचे आवाहन केलेले असून, जिल्हा बँकेच्या सभागृहात बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या सभेत आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या जिल्ह्यामध्ये तब्बल ६१ शाखा कार्यरत असून, त्यामध्ये ३ लाखापेक्षा अधिक महिलांची बचतखाती आहेत, त्यामुळे सध्या चालू असलेल्या बचतखात्यामध्येदेखील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील रक्कम जमा करून या योजनेचा लाभ महिलांना घेता येणार आहे. बँकेच्या वतीने जिल्ह्यातील अनेक खातेधारकांना प्रधानमंत्री किसान योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना, जीवन सुरक्षा योजना याचा लाभ देण्यात येतो आणि विशेषतः जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ग्राहक आमच्यासोबत कायमस्वरूपी जोडला असल्यामुळे रायगड जिल्हा सहकारी बँक ही या सर्व खातेधारकांना आपली जिव्हाळ्याची बँक पान २ वर



# दिल्ली-मुंबई १२ तासांचे स्वप्न भंगणार?

। पनवेल । वार्ताहर ।


सध्या दिल्ली ते मुंबई या रस्ते प्रवासाला २४ तास लागतात. केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी या दोन्ही शहरांचे प्रवास अंतर १२ तासांवर आणण्यासाठी बडोदा-मुंबई महामार्गाचे बांधकाम हाती घेतले असून, सरासरी ४५ टक्के पूर्ण झाले आहे. पुढील वर्षी मे महिन्यात हा महामार्ग रहदारीससुरुहोण्याच्यावाटेवर असला तरी या महामार्गाला मुंबईशी जोडणाऱ्या विरार-अलिबाग बहुउद्देशीय महामार्गाचे भूसंपादन अवघे २२ टक्केच झाल्याने केंद्र सरकारचे दिल्ली-मुंबई १२ तासांचे स्वप्न भंगणार अशी चिन्हे आहेत.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे वरिष्ठ प्रकल्प अधिकारी पी.डी. चिटणीस यांनी दिलेल्या माहितीनुसार, बडोदा-मुंबई महामार्गाचे सात टप्प्यांमधील बांधकाम सरासरी ४५ टक्के पूर्ण झाले आहे. अनेक टप्प्यांत ८० टक्के बांधकाम झाले आहे. ४० टक्क्यांच्या खाली कुठेही काम थांबलेले नाही.

असाच कामाचे वेग राहिल्यास पुढील वर्षी मे महिन्यात हा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्याची तयारी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची आहे.

महाराष्ट्रातील ८ पॅकेज (टप्पे) आहेत. यातील एक टप्पा एमएसआरडीसी करीत असून, उर्वरित सात टप्पे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण करत आहे. राज्यातील हा महामार्ग पान २ वर

### विरार-अलिबाग महामार्गाचे भूसंपादन अवघे २२ टक्केच





# शाळांना अमली पदार्थांचा विळखा

- पानटपऱ्यांमधून सर्रास विक्री
- तक्रारी करुनही कारवाई नाहीच



**। पेण । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई, मुंबईमध्ये दोन दिवसांपूर्वी शाळा, महाविद्यालयाच्या आजूबाजूला असणाऱ्या पानटपऱ्यांना जमीनदोस्त करण्यात आले. त्याच धरतीवर पेणसह रायगडमध्ये कारवाई व्हावी, अशी इच्छा पालक व्यक्त करत आहेत. कारण, कोणत्याही शाळा-महाविद्यालयापासून हाकेच्या अंतरावर पानटपऱ्यांमधून सर्रास प्रतिबंधित सुगंधी सुपारी, तंबाखूजन्य पदार्थ, एमडीची विक्री होतानाचे चित्र दृष्टीस पडत आहे. हे पदार्थ विक्री रोखण्याची जबाबदारी अन्न व औषधी प्रशासनावर असली तरी समाजातील लोकप्रतिनिधी, प्रशासन, शिक्षक, पालक, सामाजिक संस्था, शाळा व्यवस्थापन आदी सर्वच घटकांचे ते अपयश मानले जाते. नियमानुसार ५०० मीटरच्या आत कोणत्याही प्रकारची पानटपरी अथवा प्रतिबंधक पदार्थ विक्रीसाठी असणाऱ्या टपऱ्या नसाव्यात. परंतु, पेण शहराचा एक फेरफटका मारल्यावर आपल्या नजरेस जे दृश्य दिसते ते अतिशय भयानक व काळजी करणारे आहे.

शाळा-महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी प्रतिबंधक सुगंधी सुपारी, तंबाखूजन्य पदार्थ, अडकले आहे. तंबाखूजन्य पदार्थावर नियंत्रण ठेवण्याची कायद्याने जबाबदारी असलेल्या अन्न व औषधी प्रशासन विभागाच्या धरमतर रोडवरील कस्तुरी प्लाझा वरील कार्यालयाच्या ५०० मीटर परिसरातच तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होताना दिसते.

शाळा-महाविद्यालयाच्या परिसरात, चौका-चौकात दिसणाऱ्या प्रतिबंधित सुगंधी सुपारीच्या रिकाम्या पुड्या हे या प्रतिबंधक तंबाखूजन्य पदार्थ तस्करी व विक्रीचे भक्कम पुरावे ठरत आहे. विद्यार्थी व तरुणाई केवळ तंबाखूजन्य पदार्थांच्या आहारी गेलेली नसून गांजा, ब्राऊन शुगर, अफीम, एमडी यासारख्या अमली पदार्थांनीही त्यांना विळखा घातला आहे. प्रतिष्ठीत नेतेमंडळींची बिघडलेली मुले तर चलनी नोटांमध्ये गांजा-ब्राऊन शुगर टाकून सार्वजनिक ठिकाणी ती ओढत असल्याचे चित्र कित्येकांनी पाहिले आहे. पेण शहराच्या पूर्वेकडील कासमाळ परिसर, मोतीराम तलाव, पबजी रोड, कालवा रोड, पेण प्रायव्हेट हायस्कूलवरील रिंग रोड आदी ठिकाणी मुले अमली पदार्थांचे सेवन करताना दिसतात. हे अमली पदार्थ या मुलांना सहजपणे उपलब्ध होतात. गेल्या कित्येक वर्षात पोलिसांनी गांजा, अफीम, ब्राऊन शुगर विक्रेत्यांवर कारवाई केल्याची नोंद आहे, परंतु एक किलो पकडायची आणि १०० ग्रॅम दाखवायची हाच खाक्या खाकीवाल्यांनी अगदी तंतोतंत पाळला आहे, अशी चर्चा आहे.

पेण फणसडोंगरी परिसरात यापूर्वी अनेक वेळा गांजा पकडल्याच्या घटना झाल्या. वडखळ, गोर्विले, खारपाडा या परिसरातदेखील गांजा विक्रेत्यांना पकडले. रोडे कातकरी वाडीतील महिलांनी आपली करूण कहाणी कित्येक वेळा पोलीस व प्रांतांना सांगितली; परंतु आजतागायत रोडे येथील दारूबंदी झाली नाही. पेण शहरात पेण प्रायव्हेट हायस्कूल ही १०० वर्षे जुनी शिक्षण संस्था आहे. त्याच्या बाजूला उभ्या राहिलेल्या अनधिकृत टपऱ्यांविरूध्द संस्था चालकांनी वेळोवेळी नगरपालिकेला लेखी तक्रारी केल्या आहेत. परंतु, आजतागायत नगरपालिका प्रशासनाकडून कोणतीही कारवाई झालेली नाही. त्याचबरोबर पेण येथील दुसरी महत्त्वाची शिक्षण संस्था म्हणजे महाराष्ट्र शिक्षण संस्था. या संस्थेच्या प्रवेशद्वारापासून हाकेच्या अंतरावर आपल्याला टपऱ्या पहायला मिळतात. त्यानंतर पेण म्हाडा वसाहतीत गुरूकुल संस्था त्याच बाजूला नगरपालिकेची प्राथमिक शाळा आहे. तर पेणमधील नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांच्या शेजारी मोठ्या प्रमाणात आपल्याला या टपऱ्या पहायला मिळतात. आणि तंबाखूजन्य पदार्थांची सर्वात जास्त सर्रास विक्री टेक्निकल कॉलेजच्या शेजारी होते, अशी माहिती आहे. या कॉलेजच्या संरक्षण भिंतीच्या शेजारी अशा प्रकारची टपरी असून, बरोबर १०० मीटर अंतरावर पतंगराव कदम महाविद्यालय आहे. त्याच्याच शेजारी पेण तालुक्याचे न्यायालय आहे. हीच स्थिती पॉलिटेक्निकल शेजारी पहायला मिळते. एकूणच काय तर, पेण शहरात शैक्षणिक संस्थांच्या बाजूला मोठ्या प्रमाणात, तंबाखूजन्य पदार्थ व सुगंधी सुपारी विक्रीच्या टपऱ्या सर्रासपणे सुरू आहेत. याविरुद्ध वेळेस कारवाई झाली नाही तर अख्खी एक पिढी बरबाद व्हायला वेळ लागणार नाही.

## माहिती घेऊन पानटपऱ्यांवर कारवाई करणार

**भ्रमणध्वनीवरुन अन्न व औषध प्रशासनाचे प्रमुख एम.आर. घोसाळवाड यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी सांगितले की, ज्या-ज्या शैक्षणिक संस्थांबाहेर नियमबाह्य टपऱ्या अगर दुकाने आहेत, त्यांच्यावर माहिती घेऊन कारवाई केली जाईल. जे शासनाने नियम घालून दिलेले आहेत. त्या नियमांचा कोण उल्लंघन करीत असतील, तर त्याविरुध्द कायदेशीर व दंडात्मक कारवाई केली जाईल.**

# पोलिसाला ऑनलाइन गंडा




**। चणेरा। प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील राहणार खैरे खुर्द येथील ४३ वर्षीय शाहनवाज युनूस मुकादम याने फिर्याद दिली आहे. त्यानुसार संदीप कुमार आणि संतोष कुमार यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. आरोपींनी फिर्यादी यांना पोलीस निरीक्षक संजय धुमाळ यांच्या नावाने फेसबुक मेसेंजरवर मेसेज करून माझे मित्र संदीप कुमार यांच्याकडे असलेले फर्निचर कमी दरात विकायचे असून, संदीप कुमार आणि संतोष कुमार यांच्या खात्यात ६१,५०० रुपये ट्रान्सफर करण्यास सांगितले. फिर्यादीस आरोपींच्या बँकेचा खाते क्रमांक देऊन त्यावर फिर्यादीस पैसे भरायला लावून फिर्यादीची ऑनलाईन तांत्रिक पद्धतीने ६१ हजार ५०० रुपयांची फसवणूक केली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर फिर्यादीने रोहा पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली. याप्रकरणी पुढील तपास पोलीस निरीक्षक देविदास मुपडे करीत आहेत. फेसबुकसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून फसवणूक करण्याचे प्रकार वाढले आहेत. नागरिकांनी सावधगिरी बाळगावी आणि अशा फेक कॉल किंवा फेक मेसेज करणाऱ्या या सायबर गुन्हेगारापासून सावध राहावे, असा इशारा नागरिकांना पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांनी दिला आहे.

# कृषी सप्ताहानिमित्त वृक्षारोपण



**। रसायनी । वार्ताहर।**

कृषी सप्ताहानिमित्त प्रसोल केमिकल्स होनाड आणि रसायनी पाताळगंगा नदी व पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तसेच शिवछत्रपती विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील परिसरात विविध जातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

दरम्यान, आंबा, वड, पिंपळ, फणस, जांभुळ आदी वृक्षांची लागवड शालेय मैदानाच्या परिसरात करण्यात आली. तसेच प्लास्टिक बंदी म्हणून कापडी वाटप करुन नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगण्यात आले. यावेळी अरुण जाधव अध्यक्ष पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, भास्कर लांडगे शाळा कमिटी अध्यक्ष, मुख्याध्यापक जाधव, निलेश जाधव, पगारे मॅडम, आव्हाड मॅडम, सोनवणे, देव मुंढे, विर आदी शिक्षक उपस्थित होते.

## अध्यक्षपदी मंदार पाटील यांची निवड

**। उरण । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा परिषद शाळा दिघोडे अध्यक्ष निलेश पाटील यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने नव्याने अध्यक्ष व कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी मंदार पाटील, तर उपाध्यक्षपदी स्वाती म्हात्रे यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून दिव्या पाटील, अस्मिता पाटील, निलेश पाटील, संजीवनी कोळी, नीता कोळी, गणेश नागोरकर, महेंद्र जोशी, प्रसिद्धी कासकर यांची निवड करण्यात आली. यावेळी सरपंच कीर्तिनीधी ठाकूर, उपसरपंच अभिजीत पाटील, माजी उपसरपंच प्रफुल्ल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# स्वच्छतादूतांना छत्री, दुचाकीस्वारांना छत्रीवाटप



**। रसायनी । वार्ताहर ।**

कोरोना योद्धा सहाय्यक फौजदार स्वर्गीय महेश कळमकर यांच्या चतुर्थ स्मृती दिनानिमित्ताने स्वच्छतादूतांना छत्री आणि दुचाकीस्वारांना हेल्मेटचे वाटप दिलासा फाऊंडेशन खालापूरतर्फे करण्यात आले.

कोरोनाच्या पहिल्या लाटेत कर्तव्य बजावत असताना महेश कळमकर यांचा कोरोनामुळे मृत्यू झाला होता. रायगड जिल्ह्यातील पोलीस दलातील कर्तव्य बजावत असताना मृत्युमुखी पडलेले महेश कळमकर हे पहिले पोलीस कर्मचारी होते. महेश कळमकर यांनी वडखळ,पेण, कर्जत, रसायनी या ठिकाणी नोकरी केली होती. गंभीर गुन्हे असलेले, कित्येक वर्षे फरारी असलेले आरोपी परराज्यातून आणण्यात महेश कळमकर यांचा हातखंडा होता. त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी दिलासा फाऊंडेशन खालापूरतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गुरुवारी खालापूर नगरपंचायत सफाई कामगारांना खालापूर पंचायत समितीचे माजी उपसभापती उमेश गावंड, व्यापारी असिस्ट्रेशनचे अध्यक्ष नरेंद्र शहा, नगरसेविका लता लोते, उज्वला निधी, सामाजिक कार्यकर्ते शेखर जांभळे, इनरव्हील क्लबच्या माजी अध्यक्ष क्षमा आठवले यांच्या हस्ते छत्री वाटप करण्यात आले. महेश कळमकर यांच्या स्मरणार्थ रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत दुचाकीस्वारांना हेल्मेट वाटपाचा कार्यक्रम रसायनी पोलीस ठाणे या ठिकाणी घेण्यात आला. रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय बांगर, महिला पोलीस उपनिरीक्षक मीनल शिंदे, सहाय्यक फौजदार राजेंद्र सरोदे, पोलीस हवलदार मंगेश लांगी, महिला पोलीस कर्मचारी प्रियांका वेळे, प्रियांका कांबळे, वडगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अविनाश पाटील, निकेतन मोधले, पत्रकार दिनकर भुजबळ, दीपक जगताप, विकी भालेराव, दिनेश पाटील, किशोर साळुंखे, प्रशांत वाघ यांच्यासह सामाजिक क्षेत्रातील अनेक जण उपस्थित होते. साबाई मंदिर, रसायनी पोलीस ठाणे परिसरात वृक्षारोपणदेखील करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश विचारे यांनी केले.

# माजगाव ग्रा.पं.कडून वृक्षारापेण

**पाताळगंगा :** माजगाव ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पेरु, आवळा, साग, बदाम अशा १०९० वृक्षांची लागवड करण्यात आली. यासाठी ग्रामपंचायतीच्या परिसरातील असलेली स्मशानभूमी, माळरान, रस्त्याच्या दुर्तफा, शाळा परिसर येथे वृक्षलागवड करण्यात आली. ग्रुप ग्रामपंचायत माजगाव या परिसरात माजगाव, वारद, पौध तसेच अदिवासीवाड्या अशा विविध ठिकाणी या वृक्षांचे लागवड करण्यात आली. यावेळी माजगाव सरपंच दिपाली पाटील, ग्रामसेवक संदीप धारणे, मा. उपसरपंच राजेश पाटील, सदस्या प्रांजळ जाधव, पूनम जाधव, सरिता वाघे, अर्पणा शिंदे, वैशाली महाब्दी, वंदना महाब्दी, शशिकांत पाटील, मधुकर गायकवाड, को.ऐ.सो. माध्यमिक शाळा माजगाव मुख्याध्यापक गौतम कांबळे, नरेश पाटील, सूर्याजी पाटील तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसव्दारे कळविणेत येते की, श्री. अरविंद अकुंश आंबेकर. रा. दिवा ईस्ट, ठाणे, यांनी या कार्यालयात त्यांचे आजोबा गोपाळ बाळू आंबेकर यांच्या मृत्यु नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे. सदर अर्जात त्यांनी प्रतिज्ञापत्राव्दारे त्यांचा मृत्यु दि. ०२/०५/१९९८ रोजी मौजे कोशिंबळे, ता. सुधागड जि.रायगड येथे झाला आहे परंतु त्याची नोंद अद्यापर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे नमुद केले आहे.

सदरहू गोपाळ बाळू आंबेकर यांच्या मृत्यु नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यु नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसव्दारे प्रसिध्द करणेत येत आहे.

सदर नोटीस पेपर नोटीस प्रसिध्दीकरीता माझ्या सही व शिक्कानिशी दिली आहे.

ठिकाण:- सुधागड पाली
दिनांक : ०५/०७/२०२४

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

## पान १ वरून

### कोणाचीच माघार नाही

सातव, शिवसेना ठाकरे गटाचे मिलिंद नार्वेकर निवडणूक लढणार आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीच्या कोणत्याही उमेदवाराने उमेदवारी अर्ज मागे न घेतल्याने विधानपरिषद निवडणुकीत चुरस निर्माण झाली आहे.

### ऑगस्टमध्ये पंचायत निवडणुका

**उरण : बांधपाडा, आवरे, गोवठणे, विंधणे, हनुमान कोळीवाडा, सोनारी, कोप्रोली, मोठी जुई.**

**कर्जत : आसल, माणगाव तर्फे वरेडी, शेलू, पिंपळोली, मानिवली, पाषणे, वारे, कशेळे, बीड बुद्रुक, सावळा-हेदवली, मोग्रज, बोरीवली, अंजप, चिंचवली, भालीवडी, पळसदरी, हालिवली, ममदापूर, सावेळे, खांडपे, किरवली, पाथरज, शिरसे, रजपे, जामरुंग, उमरोली, नेरळ, वाकस, तिवरे, वरई.**

**खालापूर : वडगांव, कलोते, नांवडे.**

**रोहा : आंबेवाडी, ऐनवहाळ, कडसुरे, किल्ला, कुडली, कोलाड, चिंचवली तर्फे अतोणे, जामगाव, देवकान्हे, धाटाव, धोंडखार, नेहरुनगर, पाटणसई, पिगोंडा, पिंगळसई, पुगांव, भालगांव, भिसे, मढाली, खुर्द, मेढा, वणी, वरसगांव, वाली, वांगणी, सारसोली, संभे.**

**सुधागड : कुंभारशेत, नागशेत, नेणवली, उध्दर, वाघोशी, चिखलगांव.**

**माणगांव : पोटणेर, वावे दिवाळी, विळे, वरचीवाडी, पाणसई, कोस्ते खुर्द, दाखणे, मढेगांव, तळेगांव- गोरेगांव, सुरव- तळे, निळज तळाशेत, पाटणूस, रवाळजे, साजे, सणसवाडी, साळवे, निजामपूर, पेण- तळे, साले, फलाणी.**

**तळा : रोवळा, वरळ, पन्हेळी, सोनसडे, काकडशेत, पिटसई, मालूक, वानस्ते, महागांव, पढवण, मेढे, बोरघर हवेली, मजगांव, शेणवली, वाशी हवेली, फळशेत- कर्नाळा, उसर खुर्द, वांजळोशी.**

**महाड : आंबेशिवथर, दाभोळ, जिते, कसबेशिवथर, कुंभेशिवथर, खर्डी, पांगारी, रेवतळे, सव, शिंगरकोंड, आमशेत, वाकी बुद्रूक, आंबिवली बूद्रूक, आकले, भावे, दहीवट, कांबळे तर्फे महाड, किंजळोली बूद्रूक, कुंभार्डे, निजामपूर, पाने, सांदोशी, सोनघर, तेटघर, वाळण बुद्रूक, विन्हेरे, वलंग, वरंडोली, वसाप, चोचिंदे.**

**श्रीवर्धन : निगडी, वडघर, खुजारे, कार्ले, आराठी, काळिंजे, दांडा, शिस्ते, गौळवाडी, नागलोली, हरेश्वर, भोस्ते, वडवली, बोर्ली पंचतन, वेळास, मारळ.**

**म्हसळा : मेंदडी, आंबेत, खारगांव बुद्रूक, कोळे, मांदाटणे, रोहिणी, खारगांव बुद्रूक, खामगांव, गोंडघर, तुरूंबाडी, चिखलप.**

### 'आरसीडीसी'चा बहिणींना दिलासा

वाटते, त्यामुळे बँकेने कोणतेही शुल्क न आकारता झिरो बॅलन्सने हे नवीन खाते सुरू करणार असून, त्याचे तात्काळ आधारकार्ड लिंक केले जाणार आहे. त्यामुळे अधिकाधिक महिला ग्राहकांनी बँकेच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधावा, असे आवाहनही मंदार वर्तक यांनी केले आहे.

### एसटीला अपघात; १५ प्रवासी जखमी

पहाटे ट्रक पलटी झाला होता. याच वेळी या मार्गावरून मागच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या एसटीने या ट्रकला मागून जोरात धडक दिली. ही धडक एवढी भयानक होती की, एसटीतील जवळपास १५ प्रवासी जखमी झाले. या जखमी प्रवाशांना तात्काळ पनवेलमधील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सर्व प्रवाशांवर सध्या उपचार सुरू आहेत. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### अन्यथा जमिनी परत करा

परंतु, या जागेवर अद्यापपर्यंत एकही प्रकल्प उभा राहिला नाही. जमिनी ओसाड झाल्या आहेत. त्यात समुद्राच्या उधाणामुळे जमिनी नापिक बनल्या आहेत. पिकत्या जमिनी पाण्याखाली गेल्या आहेत. त्यामुळे शेतकरी पूर्णपणे लुटला गेला आहे. अलिबाग तालुक्यातील मेढेखार व काळवड खार विभागातील मेढेखार, कळवडखार, काचळी, पिटकिरी, कातळपाडा, कुसुंबळे, खातविरा आदी गावांतील शेतकऱ्यांवर दयनीय परिस्थिती ओढावली आहे. अनेक वर्षे उलटूनही प्रकल्प उभा राहिला नसल्याने फसवणूक झाल्याचे शेतकऱ्यांच्या लक्षात आले. याबाबत जिल्हा प्रशासनाकडे न्यायासाठी शेतकऱ्यांनी धाव घेतली. प्रकल्प उभारा, नाही तर जमिनी परत करा ही भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. अन्यायग्रस्त शेतकरी एकत्र येऊन मेढेखार व काळवड खार अन्यायग्रस्त शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष पांडुरंग पाटील व सर्व सदस्य सतत संघर्ष करीत आहेत. या शेतकऱ्यांनी समाजक्रांती आघाडी संघटनेच्या नेतृत्वाखाली हा लढा सुरु ठेवला आहे. हा लढा शेवटच्या क्षणापर्यंत लढणार असून, आगामी निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकणार, असा इशारा पांडुरंग पाटील यांनी दिला आहे.

### दिल्ली-मुंबई १२ तासांचे स्वप्न भंगणार?

बांधण्यासाठी १८ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. पुढील वर्षी मे महिन्यात हा महामार्ग वाहतुकीसाठी खुला करण्याची तयारी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण करत आहे. शेवटच्या टप्प्यातील बांधकाम मोरबे गावालगत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पूर्ण केले असून, माथेरान डोंगररांगा फोडून त्यामध्ये सुमारे साडेचार किलोमीटर लांबीच्या दुहेरी बोगद्यातून ही वाहतूक होणार आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने हे बोगदे फोडून त्यामधील काम ७० टक्के पूर्ण करुन वेळीच हा महामार्ग खुला करण्यासाठी कंबर कसल्याचे पाहायला मिळते. पावसाळ्यातसुद्धा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दुहेरी बोगद्यात जोरदार बांधकाम सुरु ठेवले आहे. पावसाळ्यामुळे काँक्रिटीकरणाचे काम बंद आहे. परंतु, एकीकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण जेवढ्या वेगाने बांधकाम करतेय, तेवढ्याच संथगतीने विरार-अलिबाग बहुउद्देशीय महामार्गाचे भूसंपादन सुरु आहे. मागील अडीच महिन्यात अवघे २२ टक्के भूसंपादन पनवेलमध्ये झाले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पीएमओ कार्यालय तसेच वेळोवेळी एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन हे संपादन लवकर झाल्यास पुढील महामार्गाची जोडणी करता येईल यासाठी पाठपुरावा करुनही संथगतीने भूसंपादन प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारचे १२ तासांमध्ये दिल्ली ते मुंबई प्रवासाचे स्वप्न भंग होईल, अशी चिन्हे आहेत.

बडोदा-मुंबई आणि विरार-अलिबाग महामार्गांमुळे पनवेलच्या ग्रामीण भागातील पूर्व बाजूकडील गावांना दळणवळणाचा नवीन पर्याय मिळणार आहे. नैना क्षेत्रातील ४० गावे थेट महामार्गाला जोडली जातील. विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेमध्ये मेट्रो रेल्वेचे नियोजन आहे. एमएसआरडीसी प्रशासनाला विरार-अलिबाग महामार्गाच्या भूसंपादनापेक्षा हा रस्ता बांधणाऱ्या ठेकेदारांना निवड प्रक्रियेत रस असल्याने त्यांनी निवड प्रक्रियेला वेग दिला आहे. मुख्यमंत्र्यांनी भूसंपादन प्रक्रियेला वेग दिला नसल्याने यापूर्वी रायगड जिल्हाधिकाऱ्यांवर बदलीची कारवाई केली होती.

### लोणेरेच्या लाचखोर अधिकाऱ्यास अटक

यांच्याकडे एक लाख रुपयांची लाच मागितली. तक्रारदार जाधव यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रायगड यांच्याकडे केलेल्या तक्रारीनुसार काल शुक्रवारी सायं. ४ वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून आंबपकर याला जाधव यांच्याकडून लाचेची रक्कम रू. ८१ हजार स्वीकारताना रंगेहाथ पकडले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक ठाणे परिक्षेत्र सुनील लोखंडे, अप्पर पोलीस अधीक्षक महेश तरडे यांच्या मार्गदर्शनाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक शशिकांत पाडावे, सहा. फौजदार विनोद जाधव, सहा. फौजदार अरुण करकरे, पोलीस हवालदार महेश पाटील, पोलीस हवालदार सागर पाटील यांनी केली.

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस हया नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत, सदर बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक सौ. मिना जनार्दन दवे यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन कं. | क्षेत्र-(हे.आर.चौ.मी) | आकार-(रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड | ५९/२/३ | ०-०२-८१ | ५.६२ |

अलिबाग,
दि. ०५/०७/२०२४

**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
MAHESH S. MHATRE
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor,
Flat No. 1. Ch. Shivaji Chouk,
Near Gawade Optics, Alibag Raigad

## पनवेल महानगरपालिका
## जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता (प्रकल्प), बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका. | ०१ रेन ट्री झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील भूखंड क्र. २८, सेक्टर ११, नविन पनवेल (पू), येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण (अकॅडमी) विकसित करणे या कामामध्ये संरक्षण भिंतीचे बांधकाम करणेस ०१ रेन ट्री झाड बाधीत होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
**(डॉ. वैभव विधाते)**
**उपायुक्त पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.पमपा/उद्यान/२१२४/प्र.क्र.४०/४८८/१/२०२४
दिनांक :- २४/०६/२०२४

प्रोसेस जमा — अर्जदारातर्फे वकिल : ॲड. अनिकेत गुरव

**अलिबाग येथील मे. सह दिवाणी न्यायाधिश व- स्तर सो.**
**श्रीमती व्ही. बी. पाटील सो यांचे कोर्टात**

दि. चौ. अर्ज नं. ७६/२०२४

## जाहीर नोटीस

श्रीमती नलिनी तुकाराम म्हात्रे, वगैरे — अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील कै. तुकाराम लक्ष्मण म्हात्रे हे दिनांक १९/०३/२०१७ रोजी न्यू मिलेनियम हॉस्पिटल कामोठे येथे मयत झालेले असून त्यांचे मृत्युपश्चात अर्जदार नं. १ ते ३ यांनी खालील नमुद मिळकतींबाबत वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) मिळणेकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

अलिबाग नगरपरिषद हद्दीतील मौजे चेंढरे, ता. अलिबाग येथील सर्व्हे नं.२५, ३६, १०० व १०१ मधील अलिबाग नगरपरिषदेच्या श्रीबाग क्षेत्रविकास योजना नं.२ मधील नोंदणीकृत खरेदीखताचा दस्त नं.७१४/१९८४ च्या दस्ताने खरेदी केलेली बिनशेती भुखंड नं. एम-१६, क्षेत्र ५४० चौमी ही बिनशेती भुखंड मिळकत

अलिबाग नगरपरिषद हद्दीतील श्रीबाग क्षेत्रविकास योजना नं.२ मधील भुखंड नं. एम-१६, हया मिळकतीवर बांधण्यात आलेल्या शिवराम सहकारी गृहनिर्माण संस्था हया इमारतीमधील तळमजल्यावरील सदनिका नं.१, अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क. ALB000002720 (1), जुना नं.१४०/श्रीबाग-२, ॲसेसमेंट प्रमाणे क्षेत्रफळ ६२.५४ चौमी ही निवासी सदनिका मिळकत

अलिबाग नगरपरिषद हद्दीतील श्रीबाग क्षेत्रविकास योजना नं.२ मधील भुखंड नं. एम-१६, हया मिळकतीवर बांधण्यात आलेल्या शिवराम सहकारी गृहनिर्माण संस्था हया इमारतीमधील पहील्या मजल्यावरील सदनिका नं.१०१. अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क. ALB000002720 (101), जुना नं.१४०/श्रीबाग- २ ॲसेसमेंट प्रमाणे क्षेत्रफळ २५.७३ चौमी ही निवासी सदनिका मिळकत

अलिबाग नगरपरिषद हद्दीतील श्रीबाग क्षेत्रविकास योजना नं.२ मधील भुखंड नं. एम-१६, हया मिळकतीवर बांधण्यात आलेल्या शिवराम सहकारी गृहनिर्माण संस्था हया इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सदनिका नं.१०२/३, अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क. ALB000002720 (102/3), जुना नं. १४०/ श्रीबाग-२ ॲसेसमेंट प्रमाणे क्षेत्रफळ २५.८५ चौमी ही निवासी सदनिका मिळकत

४) डावाळे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ६, २७, ३६, ५२, १७८, १९५, २२५, २२७, २३५, २३६, २८२ हया शेती मिळकती

तरी अर्जदाराच्या मागणीप्रमाणे त्यांना वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा दि. ०९/०८/२०२४ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यांत येवून मे. कोर्ट आवश्यक तो वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देणेचा हुकूम अर्जदार नं.१ ते ३ यांचे लाभांत करेल त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि. ०१/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायाधिश**
**व. स्तर अलिबाग**

सही/-
**अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय**
**व. स्तर अलिबाग**

**निवडक**

### रेखा म्हात्रे ॲवार्डने सन्मानित

**खारेपाट :** आरोग्यम धनसंपदा २०२४ या डॉक्टर्स डे निमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. रेखा रविंद्र म्हात्रे यांना त्यांच्या आरोग्य क्षेत्रातील उत्तम कामगिरीबद्दल हॉस्पिटल एक्सलंस ॲवार्डने आरोग्यम धनसंपदा संस्थेचे प्रोग्राम डायरेक्टर सुनिल कुमार प्रभाकरन यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सदर कार्यक्रम वाशी नवी मुंबई येथे मराठी साहित्य मंदिर ऑडिटोरियम वाशी नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता.डॉ. रेखा म्हात्रे या प्रयास हॉस्पिटलच्या डॉक्टर आहेत.

### शालोपयोगी साहित्य वाटप

**उरण :** समर्थ पाटील याच्या वाढदिवसानिमित्त आदिवासीवाडीवरील विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्यांचे वाटप करण्यात आले. उरण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा आदिवासीवाडी रानसई, चांदायवाडी चिरनेर, आदिवासीवाडी विंधणेमधील विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्य बॅग इतर लागणारे साहित्य तसेच खाऊचे वाटप करण्यात आले.यावेळी रमेश म्हात्रे, सारा प्रोडक्शनचे राजेश पाटील उपस्थित होते. यावेळी समर्थ पाटील याला विद्यार्थ्यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

### ‘शाळेचा आलेख उंचावला’

**माथेरान :** नगरपरिषदेच्या वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेत गुरुवारी दि.४ जुलै रोजीसकाळी अकरा वाजता ई लर्निंग(डिजिटल) वर्गाचे उद्घाटन माथेरान गिरीस्थान नगर परिषदेचे कार्यतत्पर मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक राहुल इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी छोटेखानी भाषणात शाळेच्या शैक्षणिक आलेखावर समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना आकार देण्याची महत्वपूर्ण भूमिका हे शाळेतील गुरुजन आत्मीयतेने करत असतात.

### विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

**तळा :** तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे कला - वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त मारुती शिर्के, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन महेंद्र कजबजे, प्राचार्य दिलीप ढाकणे, प्राध्यापक पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पांडुरंग पोटदुखे, सुचित पतारी, नारायण गायकवाड, सचिन कदम, शिर्के, महेंद्र कजबजे, आदी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

### शैक्षणिक साहित्य वाटप


**उरण :** चिरनेर आदिवासी आश्रमशाळेमध्ये जे.व्ही. के. सुतार फाऊंडेशन यांच्या माध्यमातून मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप तसेच अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शेकापक्षाचे नेते किसन सुतार, माजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, महिला आघाडी अध्यक्षा सीमा घरत, मयुर सुतार, रमाकांत म्हात्रे, शेवा गावच्या ग्रामपंचायत सदस्य भावना भोईर, रोहित भोईर, मंजुळा घरत, परेश घरत, एल. जी. म्हात्रे आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिस्तबद्ध पर्यटनासाठी प्रशासन सज्ज

## गावपातळीवर पर्यटन समित्या स्थापन; सुरक्षा यंत्रणा विकसित करण्यावर भर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**निसर्गरम्य समुद्र किनारा, घनदाट जंगले, गडकिल्ले आणि धबधबे अशी नैसर्गिक देणगी लाभलेल्या रायगड जिल्ह्यात पावसाळी पर्यटनाचे बेत आखणे काही नवीन नाही. पावसाळा सुरु झाला कि, पावसाळी पर्यटनासाठी पर्यटकांचे जथ्थे रायगड जिल्ह्यात दाखल होतात. पर्यटकांच्या गर्दीमुळे अनेक धबधबे आणि गडकिल्ल्यांवर दुर्घटना घडतात. यामुळे गेले अनेक वर्ष रायगड जिल्ह्यात पावसाळी पर्यटनावर बंदी घालण्यात आली होती. या बंदीचा फटका स्थानिक पर्यटन व्यावसायिकांना बसत असल्याने पावसाळी पर्यटनावर बंदी नको अशी मागणी वारंवार होत होती. यामुळे यंदा पावसाळी पर्यटनावर बंदी न घालता शिस्तबद्ध पर्यटनाची हाक प्रशासनाने घातली आहे.**



धोकादायक पर्यटन स्थळांवर बंदी घातली तरी हौशी पर्यटक चोरवाटेचा अवलंब करतात. गतवर्षी पर्यटन स्थळावर गर्दी होऊ नये म्हणून जमावबंदीचा १४४ कलम लावण्यात आला होता. तसेच पर्यटन स्थळाकडे जाणाऱ्या मार्गावरही पोलीस तैनात होते, मात्र तरीही काही पर्यटक जीव धोक्यात घालून छुप्या मार्गाने धरण, धबधबे गाठतात आणि अतिउत्साहात स्वतःचा जीव गमावतात. अशा पर्यटकांना रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून स्थानिक तरुणांची मदत घेतली जात आहे. तसेच गावपातळीवर पर्यटन समित्याही स्थापन करण्यात आल्या आहेत.

> **स्थानिक तरुणांच्या माध्यमातून पर्यटन स्थळांवरील अपघात नियंत्रणासाठी प्रयत्न सुरु आहेत. यासाठी तरुणांना खास प्रशिक्षणही देण्यात येणार आहे. पर्यटकांवर कारवाईपेक्षा सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी स्थानिकांच्या मदत घेतली जाईल.**
> **– सागर पाठक, अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**

# इंदापूर तलाठी सजा भाड्याच्या खोलीत

## ■ छप्पर उडालेले कार्यालय दुरूस्तीच्या प्रतिक्षेत

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

चार वर्षांपूर्वी आलेल्या चक्रीवादळासारख्या नैसर्गिक आपत्तीत नुकसान झालेल्या कुटुंबांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी शासनाला इत्यंबुत माहिती पुरवून आर्थिक मदत मिळवून दिली. त्यामुळे अनेकांच्या घरावरील उडालेले छपरे उभारली गेली.



मात्र चार वर्षांपूर्वी चक्रीवादळात उडालेले इंदापूर येथील तलाठी, मंडळ अधिकारी कार्यालयाच्या छप्पराची दुरुस्ती केली नसल्याने तलाठी कार्यालय भाड्याच्याच खोलीत सुरु असून हे कार्यालय शोधताना लाडक्या बहिणीची चांगलीच दमछाक होत आहे.

इंदापूर येथील ऐतिहासिक दगडाच्या बांधकामात असणारी जुनी इमारत बस स्थानकाच्या पाठीमागे शेकडो वर्षांपासून उभी आहे. या ठिकाणी पूर्वी इंदापूर पोलीस दूरक्षेत्र चालत होते. या इमारतीच्या पटांगणात दोन तोफा आजही उभी आहेत. त्यामुळे हि वास्तू इतिहासाची साक्ष देत असून याच इमारतीत महसूल गोळा केला जात होता. त्यामुळे पोलीस चौकी व महसूल हि दोन्ही खाती इंग्रज सरकारच्या काळापासून असावीत अशी नागरिकात चर्चा आहे.

या इमारतीतील पोलीस दूरक्षेत्र इंदापूर येथील दुसऱ्या जागेत ८ वर्षांपूर्वी स्थलांतरीत केल्याने तेथे महसूल खात्याची मंडळ अधिकारी व तलाठी कार्यालये सुरु होती. चक्रीवादळात या कार्यालयावरचे छप्पर उडून गेल्याने चार वर्षात शासनाला छप्पर बसाविण्यासाठी निधी मिळवता आला नाही.

# गावात दाखले देण्याचे शिबीर आयोजित करा

## अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेची मागणी



**। उरण । वार्ताहर ।**

शासनाने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी लागणाऱ्या कागदपत्रांसाठी तहसीलदारांनी गावागावात दाखले देणारी शिबीर भरविण्याची मागणी अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेने केली आहे. संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे. या शिबीरात एकाच ठिकाणी सर्व विभागाच्या शासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थित ही व्यवस्था करण्याचीही सूचना केली आहे.

महिलांना या योजनेतून आर्थिक लाभ मिळणार आहे. हा लाभ घेण्यासाठी शासनाने मागितलेल्या कागदपत्रे जमा करण्यासाठी महिलांना धावपळ करावी लागत आहे. त्यामुळे उत्पन्नाचे दाखले आणि इतर कागदपत्रे यासाठी उरण तालुक्यातील गावोगावी तलाठी आणि ग्रामविकास अधिकारी यांच्या नेमणुका करून महिलांना त्यांच्या गावा ठिकाणीच कागदपत्रे मिळतील याची व्यवस्था करावी. यासाठी गावोगावी सरपंच तसेच स्थानिक सामाजिक संघटना कार्यकर्ते यांचे सहकार्य घेऊन ही मोहीम राबविण्याची मागणी केली आहे.



**महाजने गावातील रत्नदीप पारंगे यांचे नुकतेच निधन झाले. शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची पत्नी रिना पारंगे यांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.**

# विद्यार्थ्यांना दिले भात लागवडीचे धडे

## ■ भालेमधील विद्यार्थी निसर्गाच्या सान्निध्यात रमले

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा भाताचे कोठार म्हणून प्रसिद्ध आहे. येथे दुबार शेती मोठ्या प्रमाणात केली जाते. विशेषतः डोंगराळ भागात नाचणी, वरी अशी पिके घेतली जाता. अशावेळी नेमकी शेती लागवड करताना पाहणे आणि प्रत्यक्षात लागवड करणे यात फरक आहे. हाच फरक प्रत्यक्षात अनुभवण्यासाठी शालेय गणवेशातील सुशिलाताई पवार विद्यालय भाले -माणगांव येथील रमेश मोतीराम धनावडे यांच्या शेतात विद्यार्थी थेट उतरले. विद्यार्थ्यांना पुस्तकातून लागवड अभ्यासली होतीच, मात्र प्रात्यक्षिकातून लागवडीचा हा धडा मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर एक आत्मिक समाधान होते.



हाच आनंद विद्यार्थ्यांना नाचणी हे पिक कसे घेतले जाते व लागवड कशी केली जाते हे प्रत्यक्ष अनुभवता आले. रोजच्या जेवणात ताटात येणारे अन्न नेमके कसा पिकते अन त्यासाठी शेतकऱ्यांना किती काबाड कष्ट घ्यावे लागतात. हा धडा प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना घेता यावा. यासाठी शिक्षकांनी अशी शक्कल लढवली होती.

नाचणी मधुमेहाच्या व्यवस्थापनासाठी उपयुक्त आहे. नाचणीमध्ये अनेक फायटोकेमिकल्स असतात ज्यात कर्करोगविरोधी गुणधर्म असल्याचे आढळून आले आहे. लहान मुले तसेच वाढत्या मुलांसाठी उत्कृष्ट आहार आहे. यामध्ये प्रथिने, कॅल्शिअम, लोह, जस्त आणि इतर आवश्यक पोषक तत्त्वे भरपूर प्रमाणात असतात अशी माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापिका रचना राम कळमकर यांनी विद्यार्थ्यांना सांगितली.

यावेळी भाले सरपंच दत्ताराम खांबे, बाळाराम यादव, भागाराम मंचेकर, भीम धाडवे, दिनेश उमासरे, मारुती धनावडे, नितीन उभारे, विलास शिरसे, मनोज भोईर, निखिल धनावडे, प्रशांत यादव, जयदास नटे यासह विद्यार्थी उपस्थित होते.

# ‘वृक्ष संवर्धन करुया!’

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

जंजिरामेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉक्टर- संजय पाटील यांनी आपल्या असोसिएशनमधील ५० डॉक्टरांना प्रत्येकी ४ वृक्ष देऊन प्रत्येकांनी निसर्ग संवर्धनाच्या कार्यात आपला ही एक मोलाचा वाटा उचलुया असे आवाहन डॉक्टर, युवकांना व नागरिकांना डॉ. संजय पाटील यांनी केले.

यावेळी आज डॉक्टर राज कल्याणी यांच्या हस्ते जांभुळाचे वृक्ष लावुन वृक्षारोपणास सुरुवात करण्यात आली. यावेळी डॉ. संजय पाटील, डॉ. मयुर कल्याणी, सुनील पटेल, डॉ. हाशिम उलडे, डॉ. हितेश जैन, डॉ. मंगेश पाटील, डॉ. रविंद्र नामजोशी, श्रुतिका फुलारे, डॉ. भाविका कल्याणी, डॉ. मकबूल कोकाटे, डॉ. अमित बेनकर, डॉ. प्रविण जैन, डॉ. अंनत जोशी, डॉ. वसीम पेशिमाम, डॉ. सदफ पेशिमाम आदी डॉक्टर उपस्थित होते.



# मनसेंचा महावितरण कार्यालयाला घेराव

## ■ गलथान कारभाराचा कार्यकर्त्यांनी केला निषेध

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात वारंवार खंडित होणारी वीज आणि आकारली जाणारी अधिकची बिले याविरुद्ध महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने कर्जत महावितरण कार्यालयाला घेराव घालण्यात आला. त्यावेळी कर्जत तालुक्यातील वीज वितरणात सुधारणा करण्याचे आश्वासन महावितरणचे अधीक्षक अभियंता यांनी दिले आहे. दरम्यान, महिनाभरात वीज समस्या सुटल्या नाहीत तर महावितरण कंपनीच्या कार्यालयावर मोर्चा काढण्यात येईल असा इशारा मनसेचे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी दिला.



यावेळी मनसेचे जिल्हा अधक्ष जितेंद्र पाटील, तालुका अध्यक्ष महेंद्र निगुडकर, तालुका उपाध्यक्ष यशवंत भवारे, तालुका सचिव समीर चव्हाण, कर्जत नगरपरिषद माजी स्वीकृत नगरसेवक हेमंत ठाणगे, नेरळ शहर अध्यक्ष हेमंत चव्हाण यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

मनसेचे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी महावितरण अधिकाऱ्यांना ग्राहकांशी व्यवस्थित आणि सभ्य भाषेत बोलायला शिकवले पाहिजे अशी सूचना केली. विजेचा लपंडाव मागील दोन महिन्यात सुरू असतानादेखील विजेची बिले वाढवून येत आहेत. वीज बिले भरली नाहीत तर मिटर कापले जात आहेत.

या सर्व परिस्थितीत नेरळमधील सहाय्यक अभियंता आणि कर्मचारी हे आर्थिक फायद्यासाठी वीज मिटर कापण्याचे नाटक करीत असल्याचे आणि नंतर पुन्हा मिटर जोडणी करीत असल्याच्या तक्रारी नेरळ शहर अध्यक्ष चव्हाण यांनी नावासह दाखल केल्या.

जुन्या वीज रोहित्र यांच्या जागी वाढलेली लोकसंख्या लक्षात घेवून जास्त दाब वाहून नेण्याची क्षमता असलेल्या वीज रोहित्र यांची व्यवस्था करावी अशी मागणी केली.त्यात किमान ७० गावातील वीज रोहित्र यांच्या जागी नवीन आणि जास्त दाबाचे वीज रोहित्र बसवण्यात यावे अशी मागणी मनसेच्या कार्यकर्त्यांनी केली.

## कुरुळमध्ये समाजोपयोगी उपक्रमातून अवधूत पाटील यांचा वाढदिवस साजरा

# गोरगरीबांशी बांधिलकी जपणारा सच्चा कार्यकर्ता

## चित्रलेखा पाटील यांचे अवधूत पाटील यांच्याबद्दल गौरवोद्गार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**अवधूत पाटील यांनी कमी वयात राजकीय व व्यवसायिक क्षेत्रात उंच भरारी घेतली आहे. स्वतःची एक वेगळी ओळख त्यांनी कमी कालावधीत निर्माण केली आहे. राजकारण व व्यावसायिक म्हणून काम करीत असताना सामाजिक बांधिलकीतून सेवा करण्याचा ध्यास त्यांच्यामध्ये आहे. समाजहितासाठी लढणारा शेकापचा सच्चा कार्यकर्ता आहे. गोरगरीबांशी बांधिलकी जपणारा कार्यकर्ता असून पक्षाच्या माध्यमातून त्यांना अशीच सेवा करण्याची संधी मिळावी, असे गौरवोद्गार शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी अवधूत पाटील यांच्याबद्दल काढले.**

अलिबाग अर्बन बँकेचे संचालक, कुरुळ ग्रामपंचायतीचे माजी सदस्य अवधुत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कुरुळमधील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या संकुलात विद्यार्थ्यांना छत्रीचे वाटप शुक्रवारी (दि.०५) करण्यात आले. यावेळी चित्रलेखा पाटील बोलत होत्या.

यावेळी माजी सरकारी वकील ॲड. प्रसाद पाटील, पंचायत समिती माजी उपसभापती, सुरेश पाटील, सत्कार मूर्ती अवधूत पाटील, संकीता पाटील, सरकारी वकील ॲड. सतिश नाईक, कुरुळ ग्रामपंचायतीचे माजी सरपंच ॲड. मनोज ओव्हाळ, माजी सरपंच प्रकाश पाटील, अनिल पाटील, माजी सदस्य योगीता पाटील, वृषाली पाटील, अवधुत पाटील, ॲड. विजय पाटील, ॲड. योगेश पाटील, रमेश पाटील, ऋषीकांत कार्लेकर, प्रवीण कार्लेकर, अमित कार्लेकर, दिनेश पाटील, संतोष पाटील, माजी तंटामुक्त अध्यक्ष रवी मगर, गौरू म्हात्रे, महेंद्र पाटील, सुधाकर पाटील, रविंद्र पाटील, रोहन पाटील, नितेश पाटील, अभिषेक घाडगे, महेश पाटील, अनुप पाटील, निहार पाटील, मनोहर पाटील, भालचंद्र पाटील, सुहास पाटील, आकाश पाटील आदी मान्यवरांसह जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, सुधागड एज्युकेशन सोसायटीमधील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी, ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चत्रलेखा पाटील म्हणाल्या, लहानपणीच वडीलांचे छत्र हरपले. अवधूत पाटील यांना त्यांच्या आईने दिलेल्या संस्कारातून त्यांनी स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करण्यास सुरुवात केली. व्यवसायिक म्हणून काम करीत असताना शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता म्हणून त्यांनी जनतेची सेवा केली. आज अवधूत पाटील एक वेगळ्या उंचीवर पोहचले आहेत, त्याचा आनंद आहे. आपल्या कष्टाबरोबर स्वतःच्या जिद्दीतून स्वतःला घडविण्याचे काम त्यांनी केले. पण गरीबांशी बांधिलकी त्यांनी कायमच जपली आहे, असे चित्रलेखा पाटील यांनी सांगितले.

### विविध सामाजिक उपक्रम

- कुरुळ बस स्थानक येथे वृत्तपत्र वाचनालय जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या व स्कूल बॅग
- कुरुळमधील तलावावर खूली व्यायामशाळा सुधागड एज्युकेशन सोसायटीमधील विद्यार्थ्यांना छत्री वाटप
- जय बजरंग व्यायाम शाळेत प्युरिफायर वाटप तसेच रंगकाम शुभारंभ
- आदिवासी वाड्यांमध्ये ताडपत्री आणि रेनकोट वाटप
- शेतकरी महिलांसाठी रेनकोट वाटप गावात २५ एलईडी पथदिव्यांचा शुभारंभ





# शहिदांमध्ये भेदभाव

राहुल गांधी व नरेंद्र मोदी यांच्यातील वादामुळे अग्निवीरचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. मोदी सरकारने आधुनिक धोरणाच्या नावाखाली लष्करातील दोन जवानांमध्ये भेदभाव सुरू केल्याचे स्पष्ट झाले आहे. अग्निवीरांना जिवंतपणी वेगळे वागवले जातेच, पण ते जर शहीद झाले तर त्यांना नियमित सेवेतील जवानांप्रमाणे नुकसानभरपाई मिळत नाही असे राहुल यांचे म्हणणे होते. वास्तविक ते खरे की खोटे हे कोणीही सामान्य माणूस भारतीय सैन्यदलाच्या वेबसाईटवर जाऊन तपासू शकतो. राहुल यांनी केलेला आरोप सत्य आहे हे सांगणारी कितीतरी माहिती तेथे उपलब्ध आहे. तरीही राहुल यांना बालकबुध्दी ठरवण्याचा चंग बांधलेल्या मोदी आणि मंडळींनी ते खोटे बोलत आहेत असा कांगावा केला. अग्निवीरांना एक कोटींहून अधिक नुकसानभरपाई दिली जाते असे संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी सांगितले. राहुल यांनी त्याच वेळी त्यांना अधिक तसेच नेमके प्रतिप्रश्न केले असते तर राजनाथ आणि मोदी तिथल्या तिथे उघडे पडले असते. पण राहुल यांनी ती संधी गमावली. सत्य काय ते शहिदांच्या कुटुंबियांना ठाऊक आहे असे सांगून त्यांनी तो मुद्दा सोडून दिला. आता राहुल यांची भूमिका व माहिती योग्य असल्यावर शिक्कामोर्तब होऊ लागले आहे. राहुल यांनी पंजाबातील अजयकुमार या शहीद झालेल्या अग्निवीराच्या कुटुंबियांची निवडणुकीपूर्वी भेट घेतली होती. त्यावेळीच त्यांनी आपल्याला कोणतीही भरपाई मिळालेली नाही असे सांगितले होते. राहुल यांनी तीच माहिती सभागृहात दिली होती. त्यावर या कुटुंबाला ९८ लाख रुपये दिले गेले आहेत असे राजनाथ म्हणाले. आता या ९८ लाखांपैकी सुमारे चाळीस लाख स्टेट बँकेचा विम्याचा समावेश आहे. बाकीच्या रकमेतही राज्य सरकारे देत असलेली भरपाई इत्यादी आहे. त्यामुळे लष्कराकडून वा केंद्राकडून या कुटुंबाला प्रत्यक्ष भरपाई वा मदत किती मिळणार हा प्रश्न कायम आहे.

### जवान नव्हे, कंत्राटी मजूर

आता ओरड झाल्यामुळे या कुटुंबाला कदाचित अधिकची मदत दिलीही जाईल. पण मूळ मुद्दा सैन्यातील नियमित जवान व अग्निवीर यांच्यात केल्या जात असलेल्या भेदभावाबाबत आहे. आज भांडवलशाहीच्या उद्रेकामुळे सर्व क्षेत्रात सरसकट कंत्राटी कामगार नेमले जातात. या कामगारांना अतिशय कमी पगार मिळतो व नोकरीची अजिबात शाश्वती नसते. तरीही आपल्याकडे गरिबी व बेकारी इतकी भयंकर आहे की लोक या नोकऱ्या पत्करतात. नव्या काळात हे असेच होत राहणार हे त्यांनी विनातक्रार मान्य केले आहे. एसटीमध्ये किंवा मुंबईच्या बेस्टमध्ये कामगार संघटनांना डावलून अशी कंत्राटी भरती मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे. नियमित सेवेतील चालकांना जर २५ हजार रुपये मिळत असतील तर या कंत्राटी सेवेतील कर्मचाऱ्यांना पाच किंवा आठ हजार रुपये मिळतात. शिवाय त्यांचे कामाचे तासही भयंकर असतात. हे चालक एकत्रच काम करतात. त्यावेळी त्यांना एकाच कामाचे वेगवेगळे पैसे मिळत असल्याबद्दल किती त्रास होत असेल याची कल्पना केलेली बरी. नागरी सेवांच्या क्षेत्रात ही स्थिती असेल तर लष्करातील भेदभाव किती भयंकर असेल? काश्मीरमध्ये कडाक्याच्या थंडीत दहशतवाद्यांशी मुकाबला करणाऱ्या तुकडीत एक जवान नियमित सेवेतला तर दुसरा हा कंत्राटी अग्निवीर असेल तर त्यांची अवस्था किती विचित्र होईल? लष्करी सेवा ही बँका किंवा सरकारी सेवेसारखी पांढरपेशी सेवा नाही. किंवा, तासाला अमुक इतकी मजुरी घेणाऱ्या बांधकाम कामगारांसारखीही ती निव्वळ पैशांशीदेखील जोडलेली नाही. कोणत्याही क्षणी प्राणांचे बलिदान द्यावे लागेल असे या सेवेतले गृहितक असते. त्यासाठीची बांधिलकी केवळ पैशाने विकत घेतली जाऊ शकत नाही. देशभक्तीची भावना असेल तरच हे शक्य होते. त्या भावनेमुळेच जवान जिवावरची साहसे करतात व कल्पनातीत असा पराक्रम गाजवत असतात. त्या पराक्रमाची किंमत पैशाने होऊ शकत नाही.

### मोदींवर कारवाई हवी

याची जाणीव असल्यानेच नियमित सैनिक व त्यांच्या कुटुंबियांसाठी विविध सवलती दिल्या जातात. त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना निवृत्तीवेतन, स्वस्त दरात वस्तू खरेदी करण्यासाठी कँटिनची सुविधा, शिक्षण तसेच नोकऱ्यांमध्ये राखीव जागा अशा विविध प्रकारे त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते. मात्र अग्निवीर योजनेने ही सर्व व्यवस्था उद्ध्वस्त केली आहे. यानुसार जवानांना केवळ चार वर्षांची कंत्राटी नोकरी दिली जाते. त्यानंतर बहुतांश जवानांना बाहेर पडावे लागेल हे गृहित आहे. अगदी थोड्या जवानांना आणखी दीर्घ काळ नोकरी दिली जाईल. अग्निवीरांचा सुरुवातीचा पगार केवळ २२-२३ हजार रुपये आहे. त्यातील काही रक्कम निर्वाह निधीसाठी कापली जाते. अग्निवीरांना कोणतीही पेन्शन नाही व कँटिनची सुविधाही वापरता येत नाही. निवृत्त जवानांसाठीच्या आरक्षणांमध्ये त्यांचा विचार होत नाही. सर्वात वाईट बाब म्हणजे अग्निवीर दुर्दैवाने मारला गेला तरी त्याला शहिदाचा दर्जा मिळत नाही. एरवी शहिदांच्या कुटुंबियांना त्यांच्या शेवटच्या वेतनाइतकी रक्कम नियमित पेन्शन म्हणून मिळते. खेरीज, वैद्यकीय लाभ, कँटिनमध्ये खरेदीची सुविधा इत्यादी पूर्वीप्रमाणेच मिळतात. मुलांना शिक्षण व नोकऱ्यांमध्ये आरक्षण असते. इतकेच काय मुलांना लग्नासाठी विशेष अनुदान मिळते. अग्निवीर शहीद झाले तर मात्र वन टाईम सेटलमेंट करावी त्याप्रमाणे एकदाच भरपाई दिली जाते. ही भरपाईदेखील प्रत्यक्ष किती आहे याबाबत मतमतांतरे आहेत. पण देशासाठी प्राण देणाऱ्या तरुण मुलाच्या जिवाची किंमत एक-दीड कोटी करणे हे भयंकर आहे. आपल्याकडची टी-ट्वेंटी स्पर्धा खेळणारा देखील त्यापेक्षा अधिक पैसे कमावतो. मोदींच्या भांडवली राजवटीचा हा हिडिस चेहरा आहे. एरवी भाजप आणि मोदी हे देशप्रेमाच्या गप्पा मारतात. पण लष्करात अशा रीतीने भेदभाव करण्यात आणि जवानांना कंत्राटी मजूर म्हणून राबवण्यात याच मोदी सरकारला यत्किंचित लाज वाटत नाही हे संतापजनक आहे. कहर म्हणजे हा बेशरमपणा उघड करणाऱ्या राहुल यांनाच खोटे पाडण्याचा प्रयत्न मोदी आणि मंडळींनी केला. यांच्यावर संसदीय कारवाई व्हायला हवी.

विचार

# निर्यातवाढीची धार, बेरोजगारीची तलवार

***अर्थक्षेत्रातील ताजी लगबग अनेक घटनांची साक्षिदार आहे. सरत्या आठवड्यामध्ये देशाचे निर्यातचित्र अधोरेखीत झाले. त्याचे विश्लेषण करता निर्यातवाढीचे आश्वासक चित्र समोर येते. मात्र, निर्यातवाढीला अधिक चालना मिळावी यासाठी काय करायला हवे याचा ठोकताळाही समोर आला. दरम्यान, देशातली निव्वळ विदेशी गुंतवणूक काहिशी घसरली असून असंघटित क्षेत्रावर बेरोजगारीची टांगती तलवार असल्याचेही दिसून आले.***




**महेश देशपांडे**

सरत्या आठवड्यामध्ये देशाचे निर्यातचित्र अधोरेखीत झाले. त्याचे विश्लेषण करता निर्यातवाढीचे आश्वासक चित्र समोर येते. मात्र, निर्यातवाढीला अधिक चालना मिळावी यासाठी काय करायला हवे याचा ठोकताळाही समोर आला. दरम्यान, देशातली निव्वळ विदेशी गुंतवणूक काहिशी घसरली असून असंघटित क्षेत्रावर बेरोजगारीची टांगती तलवार असल्याचेही दिसून आले.

आगामी अर्थसंकल्पात सोने, चांदी आणि प्लॅटिनम बारवरील आयात शुल्क चार टक्क्यांवर आणण्याची मागणी रत्न आणि दागिने निर्यातदारांनी अलिकडेच केली. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासमवेत झालेल्या पूर्व-अर्थसंकल्पीय बैठकीत रत्ने आणि दागिने निर्यात प्रोत्साहन परिषदेने सांगितले की, एकूण व्यापार निर्यातीत भारतीय रत्ने आणि दागिने उद्योगाचा सुमारे दहा टक्के वाटा आहे. तथापि, भू-राजकीय परिस्थिती, नफ्याचे नियोजन आणि हिऱ्यांच्या उपलब्धतेशी संबंधित समस्यांमुळे उद्योगाला सध्या मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत या क्षेत्रातील निर्यात पुनरुज्जीवित करण्यासाठी सरकारने उपाययोजना कराव्यात, अशी परिषदेची विनंती आहे. विशेष अधिसूचित क्षेत्रांमध्ये (एसएनझेड) हिऱ्यांची विक्री सुरू करण्याची विनंतीही परिषदेने केली आहे. दुसरीकडे, वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल विविध निर्यात प्रोत्साहन परिषदेच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन देशाच्या निर्यातीला चालना देण्यासाठी उपाययोजनांवर चर्चा करणार आहेत. एका उद्योग अधिकाऱ्याने सांगितले की, फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायझेशन (एफआयईओ) आणि लेदर एक्सपोर्ट कौन्सिलसह निर्यात संघटनांचे प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित राहतील. एक्स्पोर्ट कौन्सिलच्या एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, ते या बैठकीत व्याज सवलत योजना, लेदर आणि फुटवेअर क्षेत्रासाठी उत्पादन आधारित प्रोत्साहन (पीएलआय) योजना आणि काही क्षेत्रातील सीमा शुल्कात बदल करण्याच्या विनंतीसह इतर बाबी मांडतील.

या पार्श्वभूमीवर लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे जागतिक अनिश्चितता असूनही भारताच्या निर्यातीत चांगली वाढ झाली आहे. मे महिन्यात कमॉडिटी निर्यात ९.१ टक्क्यांनी वाढली आहे. सरकारी आकडेवारीनुसार मे महिन्यात भारतातील व्यापारी मालाची निर्यात ९.१ टक्क्यांनी वाढून ३८.१३ अब्ज झाली आहे. जागतिक स्तरावर आर्थिक अनिश्चितता असूनही अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स, फार्मास्युटिकल्स, कापड आणि प्लास्टिक यासारख्या विविध क्षेत्रांच्या चांगल्या कामगिरीमुळे निर्यातीत चांगली वाढ होणे हे समाधानकारक आणि आश्वासक चित्र म्हणावे लागेल.

रोजगारनिर्मिती, देशांतर्गत उत्पादन आणि निर्यातीला चालना देण्यासाठी 'लेदर आणि फुटवेअर एक्सपोर्टर्स असोसिएशन'ने अलिकडेच सरकारकडे चामड्याच्या उद्योगासाठी उत्पादन संलग्न प्रोत्साहन (पीएलआय) योजना वाढवण्याची मागणी केली. काउंसिल ऑफ लेदर एक्सपोर्ट्स (सीएलई) चे अध्यक्ष राजेंद्र कुमार जालान यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासोबतच्या अर्थसंकल्पपूर्व बैठकीत ही मागणी मांडली. यावेळी श्री. जालान म्हणाले, 'पीएलआय योजनेच्या अंमलबजावणीमुळे चर्मोद्योगात संरचनात्मक परिवर्तन होईल आणि देश एक प्रमुख उत्पादन केंद्र बनेल.' यासोबतच सीएलईने सरकारला कच्चे लेदर, क्रस्ट (टॅनिंगनंतर वाळलेले) चामडे उपलब्ध करून देण्याची मागणी केली असून तयार चामड्यावरील आयात शुल्कात सूट देण्याची विनंतीही केली आहे. पीएलआय केवळ क्षमता आधुनिकीकरण आणि विद्यमान युनिट्सच्या विस्तारासाठीच नव्हे तर स्टार्टअप्समध्येही देशी आणि परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देईल, असे यावेळी बोलताना जालान म्हणाले. यामुळे एकूण उत्पादन वाढण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. पीएलआयच्या फायद्यांमध्ये ६,००० कोटी रुपयांची वाढीव गुंतवणूक आणि अंदाजे २० लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कामगार कर्मचाऱ्यांच्या अतिरिक्त रोजगार निर्मितीचा समावेश असेल, असेही ते म्हणाले.

२०२२-२३ या आर्थिक वर्षात ओलसर लेदर, क्रस्ट आणि तयार लेदरची आयात ४५०.७ दशलक्ष डॉलर होती तर मूल्यवर्धित उत्पादनांची निर्यात ५.२६ अब्ज होती. म्हणजेच ती आयातीपेक्षा दहापट जास्त आहे. हे लक्षात घेता त्यांनी सरकारला तयार लेदरवरील दहा टक्के आयात शुल्क काढून टाकण्याची विनंती केली आहे. जालान यांनी सरकारला कोणत्याही निर्यात शुल्काशिवाय क्रस्ट लेदरसह सर्व मूल्यवर्धित लेदरच्या निर्यातीला परवानगी देण्याची विनंती केली आहे. असे झाल्यास पुढील दोन-तीन वर्षांमध्ये मूल्यवर्धित चामड्याच्या निर्यातीत किमान एक अब्ज डॉलर्सची मोठी झेप घेणे शक्य होईल, असे त्यांचे मत आहे. सध्या गायीच्या चामड्यावर ४० टक्के आणि म्हशीच्या चामड्यावर ३० टक्के निर्यात शुल्क आहे. या वर्षाच्या जानेवारी ते मार्च तिमाहीत देशाच्या चालू खात्यात ५.७ दशलक्ष रुपयांचा अधिशेष असून तो सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) ०.६ टक्के इतका आहे.

आता वळू या दुसऱ्या महत्वाच्या मुद्द्याकडे. 'डेव्हलपमेंट्स इन इंडियाज बॅलन्स ऑफ पेमेंट्स' या विषयावरील प्रकाशनात आरबीआयने सांगितले की, एक वर्षापूर्वी याच तिमाहीमध्ये चालू खात्यातील तूट १.३ अब्ज इतकी होती. हे प्रमाण जीडीपीच्या ०.२ टक्के इतके होते. त्याच वेळी, ऑक्टोबर-डिसेंबर २०२३ च्या तिमाहीमध्ये चालू खात्यात ८.७ बिलियनची तूट होती, जी जीडीपीच्या एक टक्के होती. या तिमाहीतील माहिती समजल्यामुळे संपूर्ण आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी चालू खात्यातील तूट २३.२ अब्ज डॉलरवर आली असल्याचे स्पष्ट झाले असून हे प्रमाण जीडीपीच्या ०.७ टक्के आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात देशाची चालू खात्यातील तूट ६७ अब्ज डॉलर्स किंवा जीडीपीच्या दोन टक्के होती. गेल्या आर्थिक वर्षाच्या मार्च तिमाहीत व्यापार तूट ५०.९ अब्ज होती. त्याच्या मागील वर्षीच्या याच कालावधीत ती ५२.६ अब्जपेक्षा कमी होती. मध्यवर्ती बँकेने सांगितले की, या विभागातील ४.१ टक्के वाढीमुळे देशाची निव्वळ सेवा प्राप्ती ४२.७ अब्ज एवढी झाली असून ती एका वर्षापूर्वीच्या ३९.१ बिलियनपेक्षा जास्त आहे. यामुळे चालू खाते सुस्थितीत आणण्यास मदत झाली आहे.आरबीआयने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, जानेवारी-मार्चमध्ये परदेशात राहणाऱ्या भारतीयांच्या ठेवीही ५.४ अब्ज इतक्या झाल्या आहेत. दुसरीकडे परदेशातून व्यावसायिक कर्जाचा आकडा २.६ अब्ज पर्यंत पोहोचला आहे. वर्षापूर्वी ही रक्कम १.७ अब्ज होती. एकूणच २०२२-२३ या आर्थिक वर्षात निव्वळ एफडीआय गुंतवणूक घसरल्याचे चित्र रिझर्व्ह बँकेच्या ताज्या माहितीतून समोर येत आहे.

आता बातमी असंघटीत उद्योगांसंदर्भातली. भारतात जुलै २०१५ ते जून २०१६ आणि ऑक्टोबर २०२२ ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत उत्पादन क्षेत्रातील १८ लाख असंघटित उद्योग बंद झाले आहेत. संबंधित कालावधीत या असंघटित उद्योगांमध्ये काम करणाऱ्या ५४ लाख लोकांच्या नोकऱ्या गेल्या. 'असंघटित क्षेत्रातील उपक्रमांचे वार्षिक सर्वेक्षण' आणि राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने केलेल्या सर्वेक्षणाच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या तथ्य पत्रकाच्या तुलनात्मक विश्लेषणातून ही बाब समोर आली आहे. ऑक्टोबर २०२२ ते सप्टेंबर २०२३ दरम्यान उत्पादन क्षेत्रात सुमारे १७८.२ लाख असंघटित युनिट कार्यरत होते, जे जुलै २०१५ ते जून २०१६ दरम्यान कार्यरत असणाऱ्या १९७ लाख असंघटित युनिटच्या तुलनेत सुमारे ९.३ टक्के कमी आहेत. या आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या लोकांची संख्याही या कालावधीत सुमारे १५ टक्क्यांनी घटून ३.०६ कोटी झाली आहे. पूर्वी ही संख्या ३.६० कोटी होती.

स्वतंत्र कायदेशीर संस्था म्हणून अंतर्भूत नसणाऱ्या व्यावसायिक घटकांचा अनकॉर्पोरेट एंटरप्राइजेसमध्ये समावेश होतो. यात साधारणपणे लहान व्यवसाय, एकल मालकी, भागीदारी आणि अनौपचारिक क्षेत्रातील व्यवसायांचा समावेश होतो. ऑक्टोबर २०२२ ते सप्टेंबर २०२३ दरम्यान १.१७ कोटी कामगार या क्षेत्राशी जोडले गेले असून त्यामुळे भारताच्या व्यापक अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांची संख्या १०.९६ कोटी झाली आहे. मात्र एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ या कालावधीतील साथीच्या आजाराच्या तुलनेत ही संख्या अजूनही कमी आहे. अनौपचारिक क्षेत्राचा समावेश असणाऱ्या असंघटित क्षेत्राला सततच्या आर्थिक धक्क्यांचा मोठा फटका बसला आहे. अशा धक्क्यांमध्ये वस्तू आणि सेवा कर आणि कोविड महामारी हे प्रमुख आहेत.

आजकाल

# हिंदू या देशात कधीही 'खतरे में' येऊ शकत नाही

**आनंद शितोळे**

स्वतःला हिंदूंचे स्वयंघोषित ठेकेदार समजणाऱ्या स्वयंघोषित संस्कारी पक्षाच्या लोकांसाठी,

लोकसभा २०२४ निवडणूक
लोकसंख्या १४० कोटी
मतदार ९६ कोटी
मतदान ६४ कोटी
भाजपला मिळालेली मत २३५९७३९३६ अर्थात २३.५९ कोटी.
भारतातल्या हिंदूंची टक्केवारी अंदाजे ८० टक्के.
म्हणजे ११२ कोटी लोकसंख्या हिंदूंची.
मतदार ८० टक्के म्हणजे ७५ कोटी मतदार हिंदूंचे.
मतदान झाल ६४ कोटी म्हणजे ५१ कोटी मतदार हिंदूंचे.
भाजपला मिळालेली मत २३ कोटी.
५१ कोटीपैकी २३ कोटी तुम्हाला आणि २८ कोटी विरोधकांना.

कोणत्या तोंडाने तुम्ही स्वतःला हिंदूंचे स्वयंघोषित तारणहार म्हणवता?

हिंदू कधीही खतरेमे येणार नाहीत, ८० टक्के लोकसंख्या असलेला समाज खतरेमे येणार नाही.

हिंदू खतरेमे आलेला म्हणून कोल्हेकुई सुरु आहे कारण तुमची धर्माची दुकानदारी खतरेमे आलेली आहे.

कुठल्याही हुकुमशाही राजवटीला आपल्या जनतेला भुलवायला आणि पाठिंबा द्यायला एक शत्रु दाखवावा लागतो.

आपल्या वाईटाला, आपला सुवर्णकाळ मातीत जायला हा शत्रूच कारणीभूत आहे अशी ठाम समजूत करून दिली जाते.

भारतात जे काही वाईट घडलेलं आहे त्याला मुस्लीम जबाबदार आहेत आणि हा देश सोनेकी चिडिया होता त्याची बरबादी व्हायला इस्लाम कारणीभूत आहे हे आपल्याला पटवून दिलेलं आहे.

आता आधुनिक काळात या प्रचाराची पुढची पातळी भारतातल्या मुस्लिमांची संख्या वाढून हिंदू खतरेमे येतील हि लोणकढी थाप मारली जाते.

सांख्यिकी आकडेवारीने या दाव्यातला फोलपणा कळून येईलही.

पण मुळात भारतातल्या हिंदुनी तत्कालीन काळात इस्लाम का स्विकारला हा कळीचा मुद्दा उरतोच. धर्मांतर दोन प्रकारे होत होत.

एक म्हणजे तलवारीच्या धाकाने आणि दुसर लाभांच्या, अधिकारांच्या, सवलतींच्या अपेक्षेने.

तलवारीच्या धाकाने धर्मांतर झाल अस म्हणाव तर हि इस्लाम मध्ये गेलेली मंडळी पुन्हा पवित्र वगैरे करून हिंदू धर्मात आणण्याची सोय नव्हती का ? अशी इनकमिंग ची सोय सोपी सुटसुटीत असती तर अनुकूल काळ आल्यावर हि मंडळी पुन्हा हिंदू होऊ शकत होती. अशी सोय उपलब्ध होती का ?

सन्मानाच्या , लाभांच्या, अधिकारपदांच्या , सवलती मिळतील, रोजगार मिळतील या अपेक्षेने स्वेच्छेने इस्लाम स्विकारलेली जनता साहजिकच भौतिक सुखांपुढे धर्म गौण मानणारी होती म्हणूनच धर्म सोडून गेली, किंवा त्यांच्या धर्मविषयक जाणीव, धर्माबद्दल असलेली आस्था आणि आपुलकी अतिशय विसविशीत होती, कमकुवत होती हाच निष्कर्ष निघतो ना ?

मुळात हिंदू धर्मात असलेली असमानता केवळ जन्माने तुम्ही कुठल्या जातीत, वर्णात जन्मलेले आहात त्यानुसार तुम्हाला समाजात मिळणारा सन्मान, तुमच स्थान ठरवणार असेल तर साहजिकच अस अपमानित करणारा धर्म कुणाला आपलासा वाटणार आहे ?

मग ज्याच्या विषयी आपलेपणाची भावना नाही तो धर्म कवटाळून बसण्यात अर्थ तरी काय आहे ?

हिंदू धर्मात असलेल्या त्रुटी दूर केल्या, तिथे समानता आली, सगळ्यांना समान हक्क मिळाले तर कोण कशाला धर्म सोडून जाईल हि साधी बाब आपल्याला कळत नाही आणि आपण हिंदुनी धर्म सोडला हेच तथ्य इस्लामने धर्मांतर घडवून आणले अस उलट पद्धतीने मांडून खापर फोडतो.

हिंदू धर्मातून धर्म त्यागून इतर धर्म स्विकारणे थांबवण्यासाठी हिंदू धर्मातल्या खालच्या वर्गाला सन्मानाने वागवण्याची गरज आहे हे विधानच मुळात गंडलेल आहे.

हिंदू धर्मात हा वरचा तो खालचा या उतरंडी नष्ट केल्या आणि सगळे एकाच पातळीवर समान झाले, समानता हा हिंदू धर्माचा गाभा झाला तर कुणाला सन्मानाने वागवण्याची गरजच भासणार नाही ना ? कुणाला तरी सन्मानाने वागवण्याची गरज आहे अस आपण म्हणतो त्यावेळी आपण वरच्या पायरीवर आहोत आणि कुणीतरी खालच्या पायरीवर आहे हे गृहीतक मान्य करतो ना?

दुसरी बाब आणि कळीचा मुद्दा.

हिंदू खतरेमे है आणि हिंदू धर्मातून इतर धर्मात जाणाऱ्या लोकांना माघारी आणल पाहिजे किंवा थोपवल पाहिजे अस जे म्हणतात त्यांना बेसिक प्रश्न.

समजा हिंदू धर्मातून कधीकाळी एखाद्याचे आजे पणजे मुसलमान झाले असतील आणि आता त्यांना पुन्हा हिंदू होण्यासाठी तुम्ही तयार असलात तरी त्यांना परत हिंदू होऊन मिळणारी जात कोणती असेल? त्यांना त्यांची पूर्वीची जात मिळेल कि प्रमोशन होऊन नवी जात मिळेल ?

हा प्रश्न विचारला कि हा धर्म धर्म खेळणारी मंडळी थातुरमातुर उत्तर देऊन वेळ मारून नेतात.

या सगळ्या गोष्टींच सार फार सोप आहे.

हिंदू धर्माच्या उतरंडीत वरच्या वर्गात असलेल्या लोकांना खालच्या पायरीवर असणारी लोक फक्त आपले गुलाम आणि सोल्जर्स किंवा सेवेकरी म्हणून हवे आहेत.

हिंदू 'खतरेमे' है च्या नावाखाली दंगलीत राडे करायला, गोरक्षक म्हणून केसेस अंगावर घ्यायला, प्रत्येक ठिकाणी हाणमार करायला हे सोल्जर्स हवे आहेत मात्र या सोल्जर्सला समानतेने वागवण्याची आमची तयारी नाहीये. तुम्ही तुमच्या जन्मदत्त जातीनुसार तुमच्या पायरीनेच राहील पाहिजे आणि तुम्ही वैदिकांच्या पालखीचे भोई म्हणूनच जगल पाहिजे एवढाच सोपा अर्थ.

हि समानता जोवर हिंदू धर्म स्विकारत नाही तोवर हिंदू खतरेमे है या भंपकपणाला काहीही अर्थ नाही.

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**६ जुलै**

**१८३७:-** प्राच्यविद्यासंशोधक, भाषाशास्त्रज्ञ आणि प्रकांड संस्.तपंडित राम.ष्ण गोपाळ भांडारकर यांचा जन्म. त्यांनी तयार केलेल्या संस्.तच्या पाठयपुस्तकांनी अगणित विद्यार्थ्यांना अनेक वर्षे उत्तमप्रकारे पाठ दिले. लंडन येथे भरलेल्या प्राच्यविद्या परिषदेत 'नाशिक येथील शिलालेख' हा निबंध त्यांनी वाचला. भांडारकर यांनी धर्मपर लेख आणि दख्खनचा प्राचीन इतिहास ही पुस्तके लिहिली. **१८८० :-** लेखक, कवी, कथा-कादंबरीकार, संपादक समाज सुधारक आणि ब्राह्मणेतर पक्षाचे कार्यकर्ते द. भि. रणदिवे यांचा जन्म ६ जुलै १८८० रोजी झाला. शिक्षण जेमतेम मराठी पाच इयत्ता आणि इंग्रजी तीन, चार इयत्ता परंतु उपजत लाभलेली बुद्धीमत्ता आणि अफाट वाचनामुळे फार मोठी साहित्यसेवा त्यांच्या हातून झाली. 'सुमती' हे सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करणारे सामाहिक त्यांनी काढले. काव्यलेखनाचीही त्यांना आवड होती 'श्रीकुलभूषण, देशभूषण चरिता, साध्वी नीली, आर्यारत्नाकरंडक आदी कवितासंग्रह त्यांच्या हयातीतच निघाले. याशिवाय रणदिवे यांची कविता भाग १ व २ या नावाने हा आणखी एक काव्यसंग्रह आहे. त्यांची कविता वैविध्यपूर्ण व आशयसंपत्र आहे. तिच्यात नव्याजुन्याचे पडसाद ऐकू येतात. लेखनावरच त्यांची उपजीविका असल्याने सरस वाङ्‌मयम ठेसाठी त्यांनी 'कुमदिनीचा सुधांशु', 'नगरतारका', 'अर्जनासुंदरी 'मयूर' अशा डझनभर कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्या बंगाली इंग्रजी कादंबरीवरून रूपांतरित केल्या होत्या. परिस्थिती बेताची असणाऱ्या या लेखकाला आयुष्याच्या अखेरीस कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी लागल्यावर थोडेफार स्वास्थ लाभले पण लेखन थंडावले. ४ मे १९२९ रोजी त्यांचे निधन झाले. **१९११:-** लेखक, तत्वज्ञान व मानसशास्त्राचे अभ्यापक मराठी विवकोशाचे अभ्यागत संपादक प्रा. वसंत विनायक अकोलकर यांचा जन्म. ह्यांची 'तर्कमंजिरी','तर्कदीपिका' ही तर्कशास्त्रावर तर 'सामाजिक मानसशास्त्र','सामान्य मानसशास्त्राची मुलतत्वे' आदी पुस्तके प्रकाशित झाली आहेत. **१९२०:-** समाजशास्त्र या विषयावरील एक नामवंत अभ्यासक आणि तज्ञ लेखक विनायक महादेव दांडेकर यांचा जन्म. भारतातील खेडी, शेती, दारिद्र्य, अन्नसमस्या, धरणे व प्रकल्पग्रस्त शेतकरी आदी विषयांवर शेकडो लेख लिहिणाऱ्या दांडेकरांनी म.मा. जगतापांच्या सहकार्याने 'महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना व गावरहाटी' ही पुस्तके लिहिली. त्यांच्या एका इंग्रजी ग्रंथाचा 'भारतातील दारिद्र्य' या नावाने अनुवाद केला. **१९२१:-** इतिहास संशोधक पांडुरंग नरसिंह पटवर्धन यांचे ३५व्या वर्षी निधन. 'राष्ट्रदितैषी' साप्ताहिक काही काळ चालवणाऱ्या पटवर्धनांनी 'बुदेल्यांची बखर' हे पुस्तक फार्सीतून मराठीत लिहिले. याशिवाय अनेक शोधनिबंध त्यांनी सादर केले. तथापि वयाच्या अवघ्या ३५व्या वर्षी त्यांचे निधन झाल्याने इतिहास संशोधनाच्या क्षेत्रात मोठी हानी झाली. **१९२७:-** कथा, कादंबरीकार, नाटककार व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्म. 'उंबरठा', 'काळी आई', 'वारी असे अनेक कथासंग्रह. 'वावटळ','कोवळे दिवस' या कादंबऱ्या. त्यांच्या 'सत्तांतर' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार. 'तू वेडा कुंभार', 'बिकट वाट वहिवाट' मिळून १० नाटके चित्रदर्शी प्रसंग चित्रणे, जिवंत व्यक्तिचित्रणे, झाडे, पशू-पक्षी, माणसे या साऱ्यांनी त्याचे लेखन समृध्द केले. **१९४०:-** कथा, काव्य, स्पूटलेखन, बालसाहित्य आदी स्वरुपाचे लेखन करणारे लेखक प्रा. डॉ. भानुदास किशन खडसे यांचा जन्म. 'फुलराणी','शोभाराणी' हे बालसाहित्य तर 'भारतीय सामाजिक समस्या' आणि 'सामाजिक मानवशास्त्र' ही पाठयपुस्तके त्यांनी लिहिली. **१९५३:-** कवी, गझलकार प्रमोद मारोती वाळके यांचा जन्म. 'हे गाव कुणाचे आहे?' ह्या काव्य संग्रहासह 'स्पंदन निळ्या नभाचे', 'प्रश्नांची गझल' हे गझलसंग्रह प्रकाशित झाले आहे. तसेच विविध नियतकालिकांतून गझल, समीक्षा, स्पूटलेखन विविध नियतकालिकातून प्रसिध्द. **१९८०:-** कथाकार, प्रवासवर्णनकार, भाषांतरकार कमल नारायण फडके पूर्वाश्रमीच्या दिक्षित यांचा जन्म. ना. सी. फडके हे त्यांचे पती. त्यांच्या प्रोत्साहनानेच 'पट्टेवाला' ही पहिली कथा लिहिली. 'मकरंद','एक होता राजा','तेरी चूप मेरी चूप','दरवळ' हे कथासंग्रह तर 'जेव्हा रानवारा शीळ घालतो','धुक्यात हरवली वाट','त्रिवेंद्रमची सफर' ही प्रवासवर्णने. 'निष्कलंक' ही अनुवादीत कादंबरी अशी साहित्य संपदा.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

लोकसंसद

## शहरांतील वाढते वायू प्रदूषण चिंताजनक

जागतिक पातळीवरील 'लँसेट प्लॅनेटरी हेल्थ' या वैद्यकीय नियतकालिकात नुकत्याच प्रकाशित करण्यात आलेल्या अहवालातील निष्कर्षानुसार, वायू प्रदूषणामुळे दरवर्षी भारतातील दहा शहरांमध्ये एकूण मृत्यूंपैकी सात टक्क्यांहून अधिक अकाली मृत्यू होतात. वर्षाला ३३ हजार मृत्यू इतके मोठे हे प्रमाण आहे. भारतातील अहमदाबाद, बंगळुरू, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, कोलकाता, मुंबई, पुणे, शिमला आणि वाराणसी ही ती प्रमुख शहरे असून वायू प्रदूषणामुळे दिल्लीमध्ये दरवर्षी १२ हजार मृत्यू होतात. त्यानंतर मुंबई (५ हजार ९१ मृत्यू) आणि कोलकाता (४ हजार६७८ मृत्यू) या शहरांचा क्रमांक लागतो. या शहरांत हवेतील वायू प्रदूषण करणाऱ्या सूक्ष्म कणांचे प्रमाण पीएम २.५ पेक्षा अधिक असल्याचे समोर आले आहे. एकीकडे मोठ्या प्रमाणात विकासाची कामे सुरु असताना त्यासाठी जंगलावर कुऱ्हाड पडत असल्यामुळे या शहरांमधील हरितपट्टा दिवसेंदिवस कमी कमी होत चालला आहे. परिणामी येथील प्रदूषणही मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

# टीचभर रॉयल्टीत डोंगरभर खोदाई

**|| महसूल विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष**

**|| शासनाचा लाखोंचा महसूल बुडाल्याचा आरोप**

। सुधागड-पाली । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यात अवैधरित्या गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांचा सुळसुळाट झाला आहे. अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैधरित्या माती उत्खनन होत आहे. नाममात्र स्वामित्वधन (रॉयल्टी) भरून तिप्पट उत्खनन होत असून, त्यामुळे शासनाचा हजारो लाखो रुपयांचा महसूल बुडविला जात आहे. याबाबत तहसीलदार व मंडळ अधिकारी, तलाठी यांच्या निदर्शनास आणूनदेखील याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याने ग्रामस्थांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.

या माती उत्खननाचे महसूल कार्यालयातून रॉयल्टी चलन काढले जाते. मात्र, चलनावर किती ब्रास माती उत्खनन करणार आहे, याची नोंद नसून, केवळ रक्कमच दाखवली जाते. यातून शासनाचा महसूल बुडत असल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहेत.

सुधागड तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर गृहप्रकल्प उभारले जात आहेत. डोंगर पोकरण्यात आले आहे. त्यामुळे भूस्खलनाची एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही. सुधागड तालुक्यात ज्या ज्या सजामध्ये विकासकांनी माती उत्खनन केले आहे, त्या उत्खननामुळे कोणत्याही गाव व वस्तीला धोका तर नाही ना, याची चौकशी होणे गरजेचे आहे. सुधागड तहसीलदार, महसूल नायब तहसीलदार, निवासी नायब तहसीलदार हे याबाबत लक्ष देतील का? व चौकशी करतील का? याबाबत तलाठी व मंडळ अधिकारी यांनी कागदी घोडे न नाचवता प्रत्यक्ष पाहणी करण्याचे आदेश देतील का? जेणेकरून प्रशासनाला एखादी दुर्घटना घडण्याअगोदर उपाययोजना करता येईल, अशी मागणी जोर धरत आहे.

## जाहीर नोटीस

माझे अशिल श्री. विठठल रघुनाथ चव्हाण यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक श्री. रोहीत वासदेव मल्होत्रा यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क. व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड | ४९/३ | ०.१०.८० | ०.६२ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक: ०६/०७/२०२४

**ॲड. उमेश आनंद भगत**
(अधिवक्ता)
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो.नं.९०४९४८६८०५

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म.र. अर्ज १६/२०२४

### जाहिर नोटीस

प्रति,
श्री. रमेश कृष्णा भोईर
रा. मु. भिलजी, पो. बापले — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत बोरघर,
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार हे भिलजी, पो. बापळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार यांचे वडील कै. कृष्णा काशिनाथ भोईर यांना मृत्यु दि ०६/०५/२०१५ रोजी भिलजी येथील राहत्या घरी झाला होता.

मृत्यू नोंदीचे २. मात्र त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत बोरघर येथे केलेली नसल्याने त्यांचा मृत्यु दाखला मिळण्यासाठी मृत्यू नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत बोरघर यांना करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांना तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन दि.१९/०७/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकार/निर्णय देणेत येईल यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि.१९/०७/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्क्यासह दिली.

ठिकाण : अलिबाग
तारिख : ४/७/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे हातोंड,ता.सुधागड, जि.रायगड. येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन :-**

| जमिन मालकाची नांवे | गट/ स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| १) श्री. मयुरेश हरिश्चंद्र पाटील. | १७५ | ०-५०-०० | ०-१६ |
| २) श्रीम. राजश्री श्रीरंग पाटील. | २८२ | ०-४०-०० | ०-१२ |
| दो.रा.कोपर खैरने, नवी मुंबई, ठाणे.४००७०९. | २८३ | १-५४-०० | ०-३८ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- ०६/०७/२०२४

**खरेदी घेणार - श्री. विकास गोरख आहेरकर.**
रा.तांबे माला, वी आर डी ई आझादनगर
जवळ, बुरूडगाव, अहमदनगर. ४१४००१.
मो.७४०००७७२२२.

सही/-
खरेदीदारांचे लेखक,
**श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,**
६९९ जमना निवास, पाली ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

# पर्यटकांनी सावधानता बाळगावी

## नेरळ फोटोग्राफर असोसिएशनकडून आवाहन

। नेरळ । प्रतिनिधी ।



कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक पावसाळी पर्यटनासाठी येत असतात. त्यातील काही पर्यटक हे हौशी बनून निसर्गाचे नियम डावलतात आणि त्यामुळे अपघात होतात. हे अपघात झाल्यानंतर कर्जत तालुक्यातील निसर्ग पर्यटनची बदनामी ठरते. हे सर्व टाळून कर्जत तालुक्यातील निसर्ग पर्यटन बहरावे यासाठी नेरळ फोटोग्राफर असोसिएशनकडून जुम्मापट्टी येथील धबधबा ठिकाणी पर्यटकांना आवाहन करण्यासाठी फलक लावण्यात आले आहेत.

दरवर्षी पर्यटकांचे होणारे अपघात टाळण्यासाठी कर्जत तालुक्यातील महत्त्वाचा धबधबा समजला जाणाऱ्या जुम्मापट्टी येथील धबधबा सर्वांना आकर्षित करीत असतो. मात्र, याच जुम्मापट्टी धबधबा येथील खडक हे निसरडे होत असतात. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असते. ही शक्यता लक्षात घेऊन पर्यटकांनी पाण्यात मौजमजा घेत असताना काळजी घावी, असे आवाहन करणारे फलक नेरळ येथील नेरळ फोटोग्राफर असोसिएशन यांच्याकडून लावले आहेत. नेरळ फोटोग्राफर असोसिएशनकडून सामाजिक बांधिलकी हेतूने नेरळ परिसरातील धबधब्यांवर सूचना फलक लावून जाहीर आवाहन करण्यात आले. यावेळी नेरळ फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष चेतन केळकर, सचिव दिलीप मसणे, खजिनदार मनोज भोईर यांच्यासह संस्थेचे सल्लागार राजेश विभुते, नितीन म्हसे, दुर्वास सोनावने, प्रेमनाथ माळी, गणेश वेहेले आदी उपस्थित होते. नेरळ फोटोग्राफर असोसिएशनचे या आवाहनात्मक बॅनरबद्दल नेरळ पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक शिवाजी धावले यांनी कौतुक केले आहे.

## कमळ नागरी सहकारी पतसंस्थेच्या कर्मचारी वर्गाचे प्रशिक्षण

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग या संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण दि. ०६ जुलै व दि. ०७ जुलै २०२४ रोजी Coconut Ivy Resort Alibag (Big Splash) येथे होणार आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन सकाळी १०.३० वाजता होणार आहे.

**उद्घाटक : मा. आमदार श्री. प्रविण दरेकर, विधानपरिषद सदस्य, अध्यक्ष मुंबई जिल्हा सहकारी बँक**

**अध्यक्ष**
**कमळ नागरी सह. पतसंस्था अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती तिचे मालक श्री. प्रकाश भिकु धुमाळ रा. नेरळ ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**मौजे बीड बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड. जमिन मिळकतीचे वर्णन**

| स.नं/हि.नं. | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ६७/४ | ०-०७-३० | ०-३७ |
| ६८/६ | ०-०९-९० | ०-५६ |

सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाल, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क , लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बॅक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण: कर्जत
दिनांक : ०६/०७/२०२४

सही/-
**ॲड.गीतांजली जी. फुलावरे.**
कार्यालय पत्ता: ''मधुतारा'' बिल्डींग,
कचेरी रोड, कर्जत ता.कर्जत, जि. रायगड.
मो.८८८८०४५३७६/८६००३५२९८२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री.शैलेश श्रीधर जगे यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ३२ | २८/१ | ०-६६-०० | ०-३० |

सबब सदरबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, लिज, लिन, बक्षीस, कोणत्याही प्रकारची हरकत करार, ताबेकब्जा, वहिवाट अथवा अन्य असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतेही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि. ०६/०७/२०२४.

**ॲड.सतीश धर्मा डायरे,**
पत्ता- ००२, शिवतीर्थ, सहयोग
को.ऑ.हौ.सो.ब्राम्हण आळी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.९८५०४०२६५७.

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म. र अर्ज १२/२०२३

### जाहिर नोटीस

प्रति,
सौ. अरुणा अनिल पाटील
रा. मु. मेढेखार पो. पोयनाड — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुध्द

ग्रुप ग्रामपंचायत श्रीगाव, — सामनेवाला
ता. अलिबाग, जि. रायगड

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,

१. अर्जदार अरुणा लक्ष्मण थळे उर्फ सौ. अरुणा अनिल पाटील यांचा जन्म दि. ०१/०६/१९७१ रोजी राहत्या घरी मौजे मेढेखार, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड येथे झाला आहे.

२. जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत श्रीगाव कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयांत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

३. मात्र यांचा जन्म नोंद ग्रामपंचायत श्रीगाव येथे केलेली नसल्याने त्यांना जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत श्रीगाव यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.

सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापुसान दि. २४/७/२०२४ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. २४/७/२०२४ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

ठिकाण : अलिबाग
तारिख : २४/७ /२०२४८

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**



### आजचे अन्नदाते

**स्व. रमाकांत नारायण पिसाट, स्मरणार्थ, अलिबाग.**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**६ जुलै**

१) श्री. कृष्णा लक्ष्मण शेळके
वेश्वी-अलिबाग, ६-७-१९४८

## ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे

**मु.पो. शिघ्रे, ता.मुरुड-जंजिरा, जि.रायगड,**

जा.क. ६२२ — दिनांक : ०५/०७/२००४

### साहित्य दरपत्रक मागणी निविदा

ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या साहित्य खरेदी बाबत महाराष्ट्र शासन निर्णय व रा. जि.प. यांजकडील नोंदणीकृत स्थानिक पुरवठादार/दुकानदारांकडून खालील कामांच्या मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निधी स्तर | अंदा. दर |
|---|---|---|---|
| १ | मेडिक्लोर खरेदी करणे | १५ वा वित्त आयोग | ७५८४५/- |
| २ | शिघ्रे आदिवाशीवाडी व्यायाम शाळा साहित्य खरेदी करणे | १५ वा वित्त आयोग | ८६७४८/- |
| ३ | घरगुती डसबिण खरेदी करणे. | १४ वा वित्त आयोग | ३५४०००/- |
| | ग्रामपंचायत कार्यालय लॅपटॉप खरेदी करणे. | १४ वा वित्त आयोग | ७००००/- |

**टिप**

१) दिनांक -१०/०७/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत दरपत्रक सादर कराव्या उशिरा आलेल्या दरपत्रक/अर्ज स्विकारल्या जाणार नाही. सदर दरपत्रकबाबत मंजुरीनुसार परस्पर नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करण्यात येईल.
२) पुरवठादार/दुकानदार जी. एस. टी धारक नोंदणीकृत असावेत.
३) ग्रामपंचायत शिघ्रे कडे उपलब्ध निधी नुसारच बिल देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
४) १ किंवा सर्व दरपत्रकअर्ज फेटालण्याचे सर्व अधिकार तसेच दरपत्रकमंजुरीचा सर्व अधिकार सरपंच ग्रामपंचायत शिघ्रे यांसकडे ठेवण्यात येत आहे.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत, शिघ्रे**
**ता. मुरुड, जि. रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत, शिघ्रे**
**ता. मुरुड, जि. रायगड**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर सुचना

सर्व लोंकाना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री बबन भोरु ढाकवळ रा. वांजळे यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे कडाव, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ११६/४/अ एकुण ०.३६.३० पोटखराबा ००.००.७० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनाक ०६/०७/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालक श्री. संजय महादेव गावंड यांचेकडून खरेदी घेणेचे निश्चित केले आहे. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, मौजे कोळगांव, ता. अलिबाग येथील :-

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हेक्टर आर.चौरस मिटर | आकार रू.पै. |
|---|---|---|
| १५१ | ०-४८-१० | ११.१९ |
| १५२ | ०-१२-६० | ३.१२ |

वर नमूद मिळकतींपैकी श्री. संजय महादेव गावंड यांचे मालकीचे ०-२०-२० हे. आर इतके क्षेत्र

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक : ०६/०७/२०२४

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
''अन्नपूर्णा', मु. पो. धोकवडे,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे

मु.पो. शिघ्रे, ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड,

जा.क्र.६२२ — दिनांक : ०५/०७/२०२४

### अल्प मुदतीची निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे ने १५ वा वित्त आयोग सन २०२३/२०२४ योजनेअंतर्गत खालील प्रमाणे कामांसाठी सीलबंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे. तरी अधिकृत ठेकेदारांनी दि. १०/०७/२०२४ रोजी संध्या ठीक ५:०० वाजेपर्यंत निविदा पाठवाव्यात, आलेल्या निविदा दि. ११/०७/२०२४ रोजी सकाळी ११:३० वाजता उघडण्यात येतील, त्यावेळी उपस्थित रहावे. निविदा फार्म दि. १०/०७/२०२४ रोजी संध्या ठीक ०५:०० वाजेपर्यंत दिले जातील, त्यानंतर उशिरा आलेल्यांना दिले जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्र कीय रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | निविदा किंमत | निविदा पाठविण्याची अंतिम तारीख | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत हद्दीतील बोरिंग दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | ४५२८६/- | ४५३/- | | १००/- | १०/०७/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| २ | शिघ्रे येथे गटार लाईन दुरूस्ती करणे. (मुजावर याच्या घराजवळील) | १५ वा वित्त आयोग | ९४५४०/- | ९४५/- | | १००/- | १०/०७/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ३ | रा.जि.प. शाळा वाणदे स्वयंपाक खोली ओटा दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | २००००/- | २००/- | | १००/- | १०/०७/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ४ | रा.जि.प. शाळा उर्दू शाळा दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | ६१३८०/- | ६१४/- | | १००/- | १०/०७/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ५ | रा.जि.प. शाळा मराठी दुरुस्ती करणे. | १५ वा वित्त आयोग | ६३२००/- | ६३२/- | | १००/- | १०/०७/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ६ | आंगणवाडी नागशेत पत्रा शेड बसविणे. | १५ वा वित्त आयोग | २००००/- | २००/- | | १००/- | १०/०७/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ७ | अंगणवाडी नवीवाडी चेंजींग रुम दुरुस्ती करणे | १५ वा वित्त आयोग | ३७८३२/- | ३७८/- | | १००/- | १०/०७/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ८ | ग्रा.प. कार्यालय पत्रा शेड स्लॅप गळती थांबविणे. | १५ वा वित्त आयोग | २३१३२८/- | २३१३/- | | १००/- | १०/०७/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ९ | आदिवाशी वाडी शिघ्रे पाईप लाईन रिपेअरिंग करणे | ग्राम निधी (१५% मागासवर्गीय) | ९००००/- | ९००/- | | १००/ | १०/०७/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| १० | शिघ्रे खारआंबोली डॅम विहीरतील गाळ काढणे | ग्रामिण पाणी पुरवठा | ६५०००/- | ६५०/- | | १००/ | १०/०७/२०२४ संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |

**अटी व शर्ती-**

१) १ टक्के इसारा रक्कम अंदाजपत्रकीय रक्कमेच्या कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी भरावी लागेल व उर्वरीत रक्कम देयकातून कपात केली जाईल.
२) कोरे निविदा फॉर्म फी रू. १००/- इतकी राहिल.
३ ) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील आवश्यक असल्यास फी भरून त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.
४) प्राप्त निविदा दि. १९/०७/२०२४ रोजी सकाळी ठिक ११:३० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात शिघ्रे येथे उपस्थितांचे समक्ष मा. सरपंच यांचे हस्ते उघडणेत येईल.
(५) निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने आपले रजिस्टेशनचे दाखले हे सत्यप्रत केलेले असावेत व सोबत चालू आर्थिक वर्षात केलेले कामाचा समक्ष प्राधिकाऱ्यांचा दाखला असावा. प्रथम प्राधान्य नोंदणीकृत ठेकेदारांस दिला जाईल.
६) कोणतीही १ अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच शिघ्रे यांनी राखून ठेवला आहे.
७) प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणे रक्कम कपात केल्या जातील. मा. शाखा अभियंता साहेब बांधकाम पं. स. मुरूड यांचेकडील तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी/सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर ते त्याच स्थितीत थांबवून कार्यरंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने ठेवला राखून आहे.
८) काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
९) जी. एस. टी नंबर आवश्यक आहे.
१०) पॅन कार्ड नंबर आवश्यक आहे.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे**
**ता.मुरूड जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे**
**ता.मुरूड जि.रायगड**

**निवडक**

## हिटमॅनचं जंगी स्वागत

**मुंबई :** विजयी परेडनंतर वानखेडे स्टेडियमवर खेळाडूंचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर सर्व खेळाडूंनी आपापल्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. घरी पोहोचताच सर्व चॅम्पियन्ससाठी सेलिब्रेशनची खास व्यवस्था करण्यात आली होती. रोहित शर्मा त्याच्या घरी पोहोचला, पण खरा उत्सव नुकताच सुरू झाला होता. त्यांचे कुटुंबीय, मित्र आणि टिळक वर्मा यांनी त्यांच्या स्वागत समारंभाचे आयोजन केले होते.

## लँगवेल्ड झिम्बाब्वेच प्रशिक्षक

**हरारे :** भारतीय संघ झिम्बाब्वे दौऱ्यावर पोहोचला आहे. या मालिकेत दोन्ही संघांमध्ये पाच टी-२० सामने खेळवले जाणार आहेत. पहिला सामना ६ जुलै रथोजी हरारे येथे होणार आहे. झिम्बाब्वे क्रिकेट बोर्डाने दक्षिण आफ्रिकेचा माजी वेगवान गोलंदाज चार्ल लँगवेल्डकडे झिम्बाब्वे क्रिकेट संघाचा गोलंदाजी प्रशिक्षकाची जबाबदारी दिली आहे. यापूर्वी अफगाणिस्तान आणि बांगलादेश यांसारख्या संघांचे प्रशिक्षकपद त्यांनी भूषवले आहे.

## यशस्वीनं जिंकले मन

**नवी दिल्ली :** भारतीय संघातील कर्णधार रोहित शर्मा, शिवम दुबे, सूर्यकुमार यादव आणि यशस्वी जैस्वाल हे मुंबईचे क्रिकेटपटू वर्षा बंगल्यावर आले होते. तिथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शाल, गणेश मुर्ती, पुष्पगुच्छ देऊन खेळाडूंचा गौरव करण्यात आला. दरम्यान, जैस्वालला जेव्हा शाल घातली, तेव्हा त्याने आधी वाकून शिंदे यांना नमस्कार केला. त्याचा हा व्हिडिओही सध्या व्हायरल होत आहे.

## मिरवणुकीत १० जखमी

**मुंबई :** विश्वचषक विजेत्या टीम इंडियाची मुंबईमध्ये विजयी मिरवणूक निघाली. या गर्दीत जवळपास १० जण जखमी झाले आहेत. यातील ८ जण जवळच्या जीटी रुग्णालयात दाखल झाले आहेत, तर २ नायर रुग्णालयात दाखल झाले आहेत. गर्दीमुळे चेंगराचेंगरी होऊन नागरिक किरकोळ जखमी झाले आहेत. जखमी सर्व स्थिर असून कोणालाही गंभीर दुखापत झाली नसल्याचे जीटी रुग्णालयाचे डॉक्टर जितेंद्र सकपाळ यांनी सांगितले.

## 'हा तर शुद्ध वेडेपणा!'

**मुंबई :** विजयी भारतीय क्रिकेट टीमची मुंबईमध्ये भव्य मिरवणूक झाली. यासाठी चाहत्यांनी तुफान गर्दी केली होती. या पार्श्वभूमीवर आमदार सत्यजित तांबे यांनी या सर्व प्रकारावर कठोर शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. मुंबईमध्ये हाथरससारखी घटना घडली नाही, याबाबत देवाचे आभार. प्रशासनाकडून हे किती बेजबाबदार प्रकारचं नियोजन होतं. इतकी मोठी रिस्क प्रशासनाने कशी घेतली? असा सवाल तांबे यांनी केला.

# पॅरिस ऑलिम्पिकसाठी २८ खेळाडूंचा भारतीय संघ

## नीरज चोप्रा करणार नेतृत्व; पारुलचा दोन स्पर्धांत सहभाग



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय ॲथलेटिक्स फेडरेशनने २६ जुलैपासून सुरू होणाऱ्या पॅरिस ऑलिम्पिकसाठी २८ सदस्यीय भारतीय ॲथलेटिक्स संघाची घोषणा केली आहे. टोकियो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता नीरज चोप्रा भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. यावेळी नीरज चोप्रासोबत किशोर जेनाही भाला फेकताना दिसणार आहे. गेल्या वर्षी आशियाई क्रीडा स्पर्धेत महिलांच्या भालाफेकमध्ये सुवर्णपदक जिंकणारी अन्नू राणी पॅरिसमध्ये झालेल्या भालाफेक स्पर्धेतही भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. पॅरिस ऑलिम्पिकसाठी २८ सदस्यीय ॲथलेटिक्स संघात १७ पुरुष आणि ११ महिला खेळाडूंचा समावेश आहे.

पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेस ॲथलीट अविनाश साबळे, तजिंदरपाल सिंग तूर, आशियातील अव्वल शॉट पुटर्सपैकी एक, महिला रेस वॉकर प्रियांका गोस्वामी आणि ४४०० मीटर रिले धावपटू मोहम्मद अनस, अमोज जॅकब आणि सुभा व्यंकटेशन तीन वर्षांपूर्वी टोकियो ऑलिम्पिकमध्ये सहभागी झाले आहेत.

मोहम्मद अनस हा भारतीय पुरुषांच्या ४४०० मीटर रिले संघाचा भाग आहे. पारुल चौधरी ३००० आणि ५००० मीटर स्टीपलचेसमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करणार आहे. पारुल चौधरी ३००० मीटर स्टीपलचेस आणि ५००० मीटर शर्यतीत सहभागी होणार आहे. दोन वैयक्तिक स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी निवडलेली ती एकमेव खेळाडू आहे.

राष्ट्रीय विक्रमधारक अक्षदीप सिंग, विकास सिंग आणि परमजीत सिंग बिश्त पुरुषांच्या २० किमी रेस वॉक स्पर्धेत भाग घेतील, तर सूरज पनवार मिश्र मॅरेथॉन स्पर्धेत प्रियंका गोस्वामीशी स्पर्धा करतील. अक्षदीप सिंग, राम बाबू, विकास सिंग, परमजीत सिंग बिश्त आणि सूरज पनवार हे सर्व पॅरिस ऑलिम्पिकमधील पुरुषांच्या २० किमी रेस वॉक स्पर्धेसाठी पात्र ठरले. सूरजने जागतिक क्रमवारीत स्थान मिळवले, तर इतर चार प्रवेश मानक पूर्ण केले. पारुल चौधरी ३ हजार मीटर स्टीपलचेस आणि ५ हजार मीटर शर्यतीत देशाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

पुरुष: अविनाश साबळे (३,००० मीटर स्टीपलचेस), नीरज चोप्रा, किशोर कुमार जेना (भाला), तजिंदरपाल सिंग तूर (शॉट पुट), प्रवीण चित्रवेल, अब्दुल्ला अबुबकर (तिहेरी उडी), अक्षदीप सिंग, विकास सिंग, परमजीत सिंग बिश्त (२० किमी चालणे) शर्यत), मुहम्मद अनस, मुहम्मद अजमल, अमोज जेकब, संतोष तमिलरासन, राजेश रमेश (४४०० मीटर रिले), मिजो चाको कुरियन (४४०० मीटर रिले), सूरज पनवार (मिश्र मॅरेथॉन चालणे), सर्वेश अनिल कुशारे (उंच उडी).

महिला: किरण पहल (४०० मी.), पारुल चौधरी (३,००० मीटर स्टीपलचेस आणि ५,००० मीटर), ज्योती याराजी (१०० मीटर अडथळा शर्यत), अन्नू राणी (भालाफेक), आभा खटुआ (शॉटपुट), ज्योतिका श्री दांडी, सुभा व्यंकटेशन, विथ्या रामराज, पूवम्मा एमआर (४४००मी रिले), प्राची (४४००मी), प्रियांका गोस्वामी (२० किमी चालण्याची शर्यत).

# रोहित-बुमराह 'प्लेअर ऑफ द मंथ'साठी नॉमिनेट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने टी २० विश्वचषक स्पर्धेनंतर जून महिन्यासाठी प्लेअर ऑफ द मंथ विजेतेपदासाठी दावेदारांची घोषणा केली आहे. यामध्ये भारतीय संघहला १७ वर्षांनंतर टी-२० विश्वचषकाचे जेतेपद मिळवून देणारे रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह व्यतिरिक्त अफगाणिस्तानचा फलंदाज रहमानउल्ला गुरबाजचा समावेश करण्यात आला आहे.

रोहित शर्माने टी-२० विश्वचषकात भारतासाठी सर्वाधिक धावा केल्या होत्या. त्याने ८ सामन्यात ३६.७१ च्या सरासरीने आणि १५६.७ च्या उत्कृष्ट स्ट्राईक रेटने २५७ धावा केल्या.

रोहितने सुपर-८ मध्ये विश्वचषकाचा सर्वात मोठा दावेदार असलेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध ४१ चेंडूत ९२ धावांची खेळी खेळली. उपांत्य फेरीतही त्याने गतविजेत्या इंग्लंडविरुद्ध ३९ चेंडूत ५७ धावा केल्या होत्या.

जसप्रीत बुमराहनेही टी-२० विश्वचषकात चांगली कामगिरी केली. त्याने ८ सामन्यात ४.१७ च्या इकॉनॉमीसह गोलंदाजी केली आणि १५ बळी घेतले. तो भारतीय संघाचा दुसरा सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज होता. तो मालिकेतील सर्वोत्तम खेळाडूही होता.

अफगाणिस्तानचा सलामीवीर रहमानउल्ला गुरबाजची कामगिरीही टी-२० विश्वचषकात उत्कृष्ट होती. तो या स्पर्धेतील सर्वाधिक धावा करणारा खेळाडूही होता. गुरबाजने १२४.३३ च्या स्ट्राइक रेटने फलंदाजी करत ८ सामन्यात २८१ धावा केल्या. या खेळीत त्याने ३ अर्धशतकेही झळकावली.

# रोहित-विराटचे जर्सी क्रमांक निवृत्त करा

## सुरेश रैना यांची बीसीसीआयकडे मागणी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघ टी २० विश्वचषक जिंकताच भारतीय संघाचे दोन शिलेदार विराट आणि रोहित शर्माने टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती झाहीर केली. दरम्यान याची शक्यता आधीच व्यक्त केली जात होती. भारतीय संघाचा दिग्गज फलंदाज विराट कोहली आणि कर्णधार रोहित शर्मा टी-२० विश्वचषक २०२४ नंतर टी २० क्रिकेट प्रकारामधून निवृत्तीची घोषणा करू शकतात. नेमकं तेच झालं. अंतिम सामन्यानंतर, दोन्ही खेळाडूंनी क्रिकेटच्याफॉरमॅटमधून निवृत्तीची घोषणा केली.

कोहली आणि रोहित यांच्या निवृत्तीवर प्रतिक्रिया व्यक्त करताना रैनाने बीसीसीआयकडे विशेष मागणी केली आहे. तो म्हणतो, मी बीसीसीआयला विराट आणि रोहितसह जर्सी क्रमांक १८ आणि ४५ निवृत्त करण्याची विनंती करतो. रैनाच्या म्हणण्यानुसार, जेव्हा तरुण खेळाडू हे जर्सी क्रमांक पाहतील तेव्हा त्यांना प्रेरणा मिळेल.जर्सी क्रमांक १८ आणि ४५ ने भारतीय संघाला अनेक महत्त्वाचे सामने जिंकण्यास मदत केली आहे.

सचिन तेंडुलकर आणि एमएस धोनी अनुक्रमे १० आणि ७ नंबरची जर्सी घालून मैदानात उतरायचे. त्यांच्या निवृत्तीबरोबरच त्याचा जर्सी क्रमांकही निवृत्त झाला आहे. याचाच अर्थ आता कोणताही युवा क्रिकेटपटू इच्छित असला तरी १० आणि ७ क्रमांकाची जर्सी वापरू शकत नाही. सध्या विराट कोहली १८ क्रमांकाची जर्सी घालून मैदानात उतरतो आणि रोहित शर्मा देशाची ४५ क्रमांकाची जर्सी घालून मैदानात उतरतो.

# बॅडमिंटन कोर्टवर खेळाडूचा हृदयविकाराने मृत्यू

**। इंडोनेशिया । वृत्तसंस्था ।**

इंडोनेशियात सुरू असलेल्या आशिया ज्युनियर बॅडमिंटन चॅम्पियनशिपमध्ये एक हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली. चीन आणि जपान यांच्यात सामना सुरू होता. या सामन्यात चीनकडून झांग झिजी खेळत होता, तर जपानकडून काझुमा कावाना कोर्टवर होता. सामन्यादरम्यान चीनचा खेळाडू अचानक कोर्टवर कोसळला आणि यानंतर त्याचा मृत्यू झाला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून अनेक यूजर्स यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत.

रविवारी (दि.३० जून) संध्याकाळी उशिरा चीनचा झांग झिजी आणि जपानचा काझुमा कावाना यांच्यात आशिया ज्युनियर बॅडमिंटन चॅम्पियनशिपचा एकेरी सामना खेळला जात होता. पहिला गेम ११-११ असा बरोबरीत असताना झांग अचानक जमिनीवर पडला. आधी त्याच्यावर कोर्टवरच उपचार करण्यात आले आणि नंतर ॲम्ब्युलन्सनं त्याला हॉस्पिटलमध्ये नेलं. परंतु त्याचा जीव वाचवता आला नाही.

# पीसीएमसीने इन्कम टॅक्सला रोखले



**। पुणे । वृत्तसंस्था ।**

जय काळेच्या शानदार गोल हॅट्ट्रिकच्या जोरावर पीसीएमसी अकॅडमीने हॉकी पुणे लीग २०२४-२५ च्या वरिष्ठ विभागीय सामन्यात इन्कम टॅक्स, पुणे संघाला ३-३ असे बरोबरीत रोखले. नेहरूनगर-पिंपरी येथील मेजर ध्यानचंद स्टेडियमवर बुधवारी झालेल्या सामन्यात सहा गोलांची बरसात झाली. दोन्ही संघांनी चुरशीचा खेळ केला.


जय काळेने (७व्या) पीसीएमसी अकॅडमीचे खाते उघडले. त्यानंतर कर्णधार आशुतोष लिंगेने (२१व्या पीसी) पेनल्टी कॉर्नरचे गोलामध्ये रूपांतर करताना इन्कम टॅक्स संघाला १-१ अशी बरोबरी साधून दिली. मात्र, त्यांचे बरोबरीचे समाधान अवघे चार मिनिटे टिकले. जय काळेने(२५व्या) पुन्हा एकदा पीसीएमसी अकॅडमीला आघाडीवर नेले. मात्र, चिराग मानेमुळे प्रतिस्पर्धी इन्कम टॅक्सने पुन्हा बरोबरी साधली. शेवटचे दोन गोल दोन मिनिटांच्या फरकाने झाले. यावेळी अथर्व कांबळेमुळे (३६व्या पीसी) पेनल्टी कॉर्नरवरील गोलने इन्कम टॅक्सला ३-२ असे आघाडीवर नेले. मात्र, फॉर्मात असलेला जय काळे (३७व्या) पुन्हा एकदा पीसीएमसी अकॅडमीच्या मदतीला धावला.

# क्रिकेटमधून निवृत्तीचा विचार नाही

## जसप्रीत बुमराहची चाहत्यांसमोर कबुली

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये स्पर्धेचा मालिकावीर ठरलेल्या जसप्रीत बुमराहने निवृत्तीबाबत मोठी प्रतिक्रिया दिली आहे. टी-२० विश्वचषक २०२४ चे विजेतेपद जिंकल्यानंतर भारतीय संघाच्या तीन दिग्गज खेळाडूंनी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती.



ज्यामध्ये रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा यांचा समावेश आहे. त्यानंतर आता बुमराहही निवृत्तीबद्दल स्पष्ट बोलला आहे. बुमराह म्हणाला की, सध्या टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा त्याचा कोणताही विचार नाही, ही फक्त त्याची सुरुवात आहे. त्यांना अजून पुढे जायचे आहे.

जसप्रीत बुमराह म्हणतो की मी सहसा कधी रडत नाही पण हा विजय अविश्वसनीय होता. माझ्या मुलाला पाहिल्यानंतर माझ्या मनात ज्या भावना उमटल्या त्या खूपच आश्चर्यकारक होत्या. यानंतर मला माझे अश्रू आवरता आले नाहीत.

# टी-२० विश्वकरंडक, आशियाई स्पर्धेची तयारी



**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

भारत-दक्षिण आफ्रिका यांच्यामध्ये तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेला सुरुवात झाली आहे. आगामी आशियाई करंडक व टी-२० विश्वकरंडक या दोन महत्त्वाच्या स्पर्धांची रंगीत तालीम म्हणून या मालिकेकडे बघितले जात आहे.

कौरच्या नेतृत्वात भारतीय महिला संघाने तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत ३-० असे निर्भेळ यश संपादन केले. त्यानंतर एकमेव कसोटी सामनाही आपल्या नावावर केला. त्यामुळे साहजिकच टी-२० मालिकेतही वर्चस्व राखण्यासाठी भारतीय संघ प्रयत्न करताना दिसणार आहे.भारतीय संघाची उपकर्णधार स्मृती मानधना हिने एकदिवसीय मालिकेत दोन शतके व एक अर्धशतक झळकावताना आपण दमदार फॉर्ममध्ये असल्याचे दाखवून दिले. हरमनप्रीत हिनेही अखेरच्या एकदिवसीय सामन्यात धडाकेबाज शतक झळकावले.

शेफालीला एकदिवसीय मालिकेत सूर गवसला नाही; पण कसोटीत तिने खणखणीत द्विशतक झळकावले. जेमिमा रॉड्रिग्ज व रिचा घोष या खेळाडूंकडूनही छान खेळी झालेल्या आहेत. एकूणच काय तर भारतीय संघातील अव्वल पाच फलंदाज फॉर्ममध्ये आहेत. भारतीय संघाने गोलंदाजी विभागातही ठसा उमटवला आहे. रेणुका सिंग, पूजा वस्त्रकार, अरुंधती रेड्डी यांनी चमक दाखवली आहे. दीप्ती शर्मा हिने अष्टपैलू कामगिरी बजावताना भारतीय संघासाठी मोलाची कामगिरी केली आहे. राधा यादव, आशा शोभना व श्रेयांका पाटील या गोलंदाजही प्रतिस्पर्ध्यांवर वर्चस्व गाजवत आहेत. भारतीय संघ फलंदाजी व गोलंदाजी या दोन्ही बाबींमध्ये सरस असल्यामुळे टी-२० मालिकेतही आफ्रिकन संघ दबावाखाली राहील, यात शंका नाही.

## संघाला ११ कोटींचं बक्षीस

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाने टी२० वर्ल्ड कप स्पर्धा २९ जून रोजी जिंकली. या स्पर्धेत अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला ७ धावांनी पराभूत केले. तब्बल १७ वर्षांनी टी २० वर्ल्ड कपवर नाव कोरले. यासाठी शासनाकडून भारतीय संघाला मोठं बक्षीस देण्यात आलं या ऐतिहासिक विजयासह भारतीय संघ गुरुवारी मायदेशी परतला. यानंतर शुक्रवारी महाराष्ट्र सरकारकडून भारतीय संघाचं कौतुक करण्यात आलं.

दरम्यान, यापूर्वीच महाराष्ट्राच्या चारही खेळाडूंना १ कोटी रुपयांच्या बक्षीसाची घोषणा करण्यात आली होती. यानंतर आता विधानसभेत बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी संपूर्ण भारतीय संघासाठी ११ कोटींच्या बक्षीस रकमेची घोषणा केली.

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते रोहितसह

# मुंबईच्या खेळाडूंचा वर्षावर झाला सत्कार



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विजेत्या संघातील मुंबईच्या खेळाडू अन् सपोर्ट स्टाफचा आज गौरव केला. मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान वर्षा बंगल्यावर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यानंतर मुख्यमंत्र्यांसोबत रोहित शर्मा आणि त्याचे सहकारी विधान भवनातदेखील दाखल झाले. कर्णधार रोहित शर्मा आणि भारतीय संघातील मुंबईचे खेळाडू अन् सपोर्ट स्टाफ यांचादेखील सत्कार करण्यात आला. यावेळी शाल, गणपतीची मूर्ती देण्यात आली.

यावेळी रोहित शर्मासोबतच संघ सहकारी यशस्वी जयस्वाल, शिवम दुबे, सूर्यकुमार यादवदेखील उपस्थित होते. एकनाथ शिंदेंनी संघाचे बॉलिंग कोच पारस म्हाम्ब्रेंचा देखील सत्कार केला. भारतीय संघाने २९ जूनला दक्षिण आफ्रिकेचा ७ धावांनी पराभव करत टी २० वर्ल्डकप २०२४ वर आपलं नाव कोरलं.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- मांडवा येथे गाडीवर ड्रायव्हर पाहिजे आहे. मो. ८००७८९३२३२/९४२१९५४३४८
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३ अलिबाग
- Wanted : Teachers, Office Assistants and Typists. Contact: Sindhu Teacher's Classes, 2nd Floor, Vishnu Mandir, Opposite Old Municipal Office, Alibag. Phone Numbers: 9422383196,8551042000, 8551052000.
- रायवाडी कॉम्प्लेक्स अलिबाग शहरामध्ये असलेल्या स्टार हेल्थ इन्शुरन्स ऑफिसमध्ये स्टाफ आवश्यक आहे. कम्प्युटरचे ज्ञान अत्यावश्यक, शक्यतो पदवीधर असावा. एक उमेदवार आवश्यक आहेत. स्त्री-पुरूष कोणीही चालतील, अनुभव असेल तर उत्तम. ९८२२९३८४४४ या नंबरवर रिझ्युम सेंड करावा. त्याप्रमाणे आपल्याला संपर्क करण्यात येईल.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

### युरो स्पर्धेत बलाढ्यांतील द्वंद्वाची पर्वणी

# जर्मनीची स्पेनशी, फ्रान्सची पोर्तुगालशी गाठ



**। हॅम्बर्ग । वृत्तसंस्था ।**

**युरो अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेत आज, शुक्रवारी होणाऱ्या उपांत्यपूर्व फेरीच्या लढतींत बलाढ्यांच्या द्वंद्वाची पर्वणी चाहत्यांना अनुभवायला मिळणार आहे. पहिल्या सामन्यात यजमान जर्मनीची गाठ यंदाच्या स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी केलेल्या स्पेनशी, तर दुसऱ्या सामन्यात फ्रान्सची गाठ पोर्तुगालशी पडणार आहे. युरो स्पर्धेत घरच्या प्रेक्षकांच्या पाठिंब्यासह खेळताना जर्मनीने चमकदार खेळ केला आहे. साखळी फेरीत अपराजित राहिल्यानंतर उपउपांत्यपूर्व फेरीत जर्मनीने डेन्मार्कवर २-० असा विजय मिळवला. मात्र, आता स्पेनविरुद्ध त्यांच्या गुणवत्तेची आणि क्षमतेची कसोटी लागणार आहे.**

स्पेनच्या संघाने साखळी फेरीत आपले सर्व सामने जिंकत आणि प्रतिस्पर्धांना एकही गोल न करू देत थाटात बाद फेरी गाठली. उपउपांत्यपूर्व फेरीत सुरुवातीला त्यांना जॉर्जियाकडून कडवा प्रतिकार सहन करावा लागला. जॉर्जियाने आघाडीही मिळवली होती. परंतु त्यानंतर स्पेनने आपला खेळ उंचावताना दमदार पुनरागमन केले आणि हा सामना ४-१ अशा मोठ्या फरकाने जिंकला.

जर्मनी आणि स्पेन या दोनही संघांत तारांकित खेळाडूंचा भरणा आहे. जर्मनीसाठी युवा आक्रमकपटू जमाल मुसियाला आणि काय हावेट्झ यांनी चम कदार कामगिरी केली आहे. तसेच म त्र, त्यातही १६ वर्षीय लेमिन यम ाल आणि २१ वर्षीय निको विल्यम्स या युवा आक्रमकांची कामगिरी उल्लेखनीय ठरली आहे. त्यामुळे आता या दोघांपासून जर्मनीला सावध राहावे लागेल. अनुभवी मध्यरक्षक टोनी क्रूसची ही अखेरची स्पर्धा असल्याने त्याला जेतेपदासह निरोप देण्याचा जर्मनीचा प्रयत्न असेल. मात्र, त्यासाठी आधी त्यांना स्पेनला नमवावे लागेल. स्पेनचे सर्वच खेळाडू लयीत आहे.

दुसरीकडे, फ्रान्ससमोर पोर्तुगालचे तगडे आव्हान असणार आहे. दोन्ही संघांना उपउपांत्यपूर्व फेरीत प्रतिस्पर्धी संघांची झुंज मोडून काढावी लागली. फ्रान्सने बेल्जियमवर १-० असा निसटता विजय मिळवला, तर पोर्तुगालला स्लोव्हेनियला नमवण्यासाठी पेनल्टी शूटआऊटचा आधार घ्यावा लागला. त्यामुळे आता दोन्ही संघांना कामगिरीत बरीच सुधारणा करावी लागेल. यात जो संघ यशस्वी ठरेल, तो स्पर्धेतील आव्हान कायम राखू शकेल.

# वुशू : चिनी मार्शल आर्ट



आशियाई स्पर्धेत वुशूमध्ये भारताने कांस्यपदकं मिळवल्याचं तुम्हाला आठवत असेल. १९४९ नंतर चीनमध्ये हा क्रीडाप्रकार भलताच लोकप्रिय झाला. वुशू म्हणजे चायनीज कुंग-फू. हा पारंपरिक चीनी मार्शल आर्टचा एक प्रकार आहे. या खेळात दांडपट्ट्यासारख्या एका शस्त्राचा वापर केला जातो. चीनी भाषेत मार्शल आर्टला वुशू असं म्हटलं जातं. वु म्हणजे मिलिटरी किंवा मार्शल तर शू म्हणजे आर्ट. म्हणून 'वुशू' म्हणजे मार्शल आर्ट. आंतरराष्ट्रीय वुशू फेडरेशनतर्फे या खेळाच्या स्पर्धेचं आयोजन केलं जातं. ही संघटना वुशूला जागतिक स्तरावर लोकप्रिय करण्यासाठी प्रयत्न करते. दर दोन वर्षांनी जागतिक वुशू अजिंक्यपद स्पर्धेचं आयोजन केलं जातं.

भारतात ब्रिज हा खेळही लोकप्रिय आहे. तो पत्त्यांचा खेळ आहे. या खेळात चार जणांचा एक संघ असतो. दोन संघ समोरासमोर बसून ब्रिज खेळतात. ब्रिज हा जगातला सर्वात लोकप्रिय असा पत्त्यांचा खेळ आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. हा खेळ ऑनलाईनही खेळता येतो. जगभरात अनेक देशांमध्ये ब्रिज खेळला जातो.

**फन टाईम**

वर्ल्ड ब्रिज फेडरेशनतर्फे जगभरातल्या ब्रिज स्पर्धांचं आयोजन केलं जातं. ट्रिक टेकिंग या प्रकारात ब्रिज खेळला जातो. ब्रिज खेळण्याची पद्धत बरीच वेगळी आहे. त्यामुळेच खेळ रंजक बनतो.

# सफर निसर्गरम्य चिलीची



चिली हा दक्षिण अमेरिका खंडातला एक देश आहे. तो लांबुळका असला तरी अरूंद आहे. या देशाला ४००० मैल लांबीचा समुद्रकिनाराला लाभला आहे. रूंदीचा विचार केला तर ती अवघी ६१ मैल इतकी आहे. चिलीमध्ये आजवर बरेच भूकंप झाले आहेत. इथे मापुचे हे स्थानिक वास्तव्यास आहेत. पण आता अवघे ५ टक्के मापुचे उरले आहेत. देशातील दक्षिण भागातल्या काही ठिकाणी त्यांचं वास्तव्य आढळतं. ते परंपरागत भाषा बोलतात आणि आपल्या धर्माचं पालन करतात.

सँटिॲगो ही चिलीची राजधानी आहे. इथली ४० टक्के लोकसंख्या सँटिॲगो आणि आसपासच्या परिसरात राहते. इथल्या ग्रामीण भागात राहणाऱ्या मुलांना पहाटे ५ वाजता उठून शाळेत चालत जावं लागतं किंवा बस पकडावी लागते. शाळेत पोहोचेपर्यंत त्यांना दोन तास लागू शकतात. शाळेतून घरी आल्यावर मुलं पालकांना शेतातील कामांमध्ये मदत करतात आणि नंतरच अभ्यास पूर्ण करतात.

सोळाव्या शतकात स्पेनने या देशाचा ताबा घेतला. त्याआधी देशाच्या उत्तर भागावर इन्कांचं राज्य होतं. १८१० मध्ये चिली स्वतंत्र झाला. अठराव्या शतकाच्या शेवटी युरोपातली मोठी जनसंख्या चिलीमध्ये राहायला आली. रेल्वेच्या बांधकामासाठी इथे चीनमधून मजूर आणले गेले. चिली हा देश निसर्गसौंदर्याने परिपूर्ण आहे. इथे विविध प्रकारचे प्राणी आढळतात. इथल्या समुद्रात वेगवेगळ्या प्रकारचे मासे आढळतात. व्हेल, पेंग्विनसाठी हा समुद्र प्रसिद्ध आहे. इथे ॲटाकामा नावाचं वाळवंट आहे. हा पृथ्वीवरचा सर्वात कोरडा भाग आहे. इथे बरेच सरपटणारे प्राणी आढळतात. या भागात तांब्याच्या खाणीही आहेत. तर मग मोठं झाल्यावर हा देश पहायला जाणार ना!

**सफर देशांची**

# पीसीवर स्मार्टफोनचा कंट्रोल?

मित्रांनो, स्मार्टफोनचा वापर करून तुम्ही घरातल्या पीसीवर नियंत्रण ठेऊ शकता. स्मार्टफोनचं एक बटण दाबून तुम्ही पीसी वापरू शकता. जगातल्या कोणत्याही कोपऱ्यात असला तरी घरातला पीसी वापरू शकता. क्रोमकास्टच्या मदतीने फाईल एका उपकरणावरून दुसऱ्यामध्ये ट्रान्सफर करू शकता. स्मार्टफोन पीसीशी कसा कनेक्ट करायचा याविषयी जाणून घ्या.




✻ स्मार्टफोनच्या प्ले स्टोअरमध्ये जा.

✻ यानंतर सर्च बारमध्ये क्रोम रिमोट डेस्कटॉप असं टाईप करून एंटर करा आणि मग तुमच्या स्मार्टफोनमध्ये ते ॲप डाउनलोड करून घ्या.

✻ आता तुमच्या पीसीवर गुगल क्रोम ओपन करा.

✻ आता गुगल क्रोमवर क्रोम रिमोट डेस्कटॉप एक्सटेंशन डाउनलोड करावं लागेल. मग ते इन्स्टॉल करावं लागेल.

✻ आता क्रोम ब्राउजरवर क्रोम://ॲप्स असं टाईप करून एंटर करा.

✻ आता क्रोम रिमोट डेस्कटॉप आयकॉनवर क्लिक करून ते ओपन करा.

✻ आता पीसीच्या माय कॉम्प्युटर ऑप्शनमध्ये जाऊन गेट स्टार्टेड हा ऑप्शन निवडा.

✻ यानंतर क्रोम रिमोट एक्सटेंशन आपोआप इन्स्टॉल होईल.

✻ आता क्रोम रिमोट डेस्कटॉप एक्सटेंशनवर जाऊन एनेबल रिमोट कनेक्शन ऑप्शनवर क्लिक करा.

✻ यानंतर तुम्हाला पिन तयार करावा लागेल.

**टेक फन**

✻ आपल्या स्मार्टफोनमध्ये क्रोम रिमोट डेस्कटॉप ॲपवर जा. यानंतर कॉम्प्युटरवर टॅप करा.

✻ इथे पिन क्रमांक टाकावा लागेल. आता तुम्ही या सेवेचा लाभ घेऊ शकता.

# केसांची काळजी घ्या



आपल्या डोक्यावर एक लाखांपेक्षा अधिक केस असतात. प्रत्येक केसाचे तीन थर असतात. बाहेरचा थर आतल्या दोन थरांचं रक्षण करतो. चमकदार केस हे निरोगी असल्याचं लक्षण असतं. केस खराब झाले की कोरडे होऊ लागतात. निस्तेज दिसतात. म्हणूनच केसांची नीट काळजी घ्यायला हवी. खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयींमुळेही केस खराब होऊ शकतात. पोषक अन्नघटकांचं सेवन केलं तर केस छान चमकदार दिसतात. केसांची काळजी घेताना काय करायला हवं याविषयी...

✻ सरळ, मऊ केस असतील तर काळजी नाही. पण ते कोरडे, कुरळे असतील तर थोडी जास्त काळजी घ्यावी लागते. केसांचा प्रकार कोणताही असला तरी त्याकडे नीट लक्ष द्यावं लागतं. काही मुलामुलींचे केस तेलकट असतात. केस तेलकट दिसतात म्हणून काही जण दररोज डोकं धुतात. पण दररोज डोक्यावरुन पाणी घेत असाल तर सौम्य शँपूचा वापर करायला हवा.

✻ तुमच्या ॲक्टिव्हिटीजचाही केसांवर परिणाम होऊ शकतो. म्हणजेच खेळाडू असला तर केसांमधून खूप घाम येतो. त्यात धूळ, माती अडकते आणि केस खराब होतात. पोहायला जात असाल तर पाण्यातल्या क्लोरिनमुळे केस कोरडे होतात. ऊन, वारा, पाऊस याचाही केसांवर दुष्परिणाम होत असतो. त्यामुळे बाहेर जाताना डोक्यावर टोपी घालावी किंवा स्कार्फ बांधावा. यामुळे केसांचं रक्षण होईल.

✻ केस खूप घट्ट बांधू नयेत. घट्ट बांधलेले केस गळू शकतात. स्ट्रेटनर किंवा कर्लरचा वापर करू नये. केस गळणं, कोंडा या समस्यांकडे दुर्लक्ष करु नये. दिवसभरात थोडेफार केस गळणं नैसर्गिक आहे. दररोज १०० च्या आसपास केस गळू शकतात. पण त्यापेक्षा जास्त केस गळत असतील तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**हेल्थ वेल्थ**

# 'टेस्टी' करिअर करायचंय?

सध्याच्या धावपळीच्या युगात स्वयंपाकासाठी कमी वेळ मिळत आहे. पण रेडी टू कूक, रेडी टू इट पदार्थांमुळे काम बरेच सुकर होत आहे. अशाच उपयुक्त अन्नपदार्थांची निर्मिती करणारं शास्त्र म्हणजे फूड टेक्नॉलॉजी! नाशिवंत अन्नपदार्थ टिकाऊ बनावेत या दृष्टीने त्यावर प्रक्रिया करणं. पण हे करताना अन्नपदार्थांमधली पोषणद्रव्यं, गुणवत्ता, रंग-रूप यांचंही जतन करणं ही तारेवरची कसरत कुशलतेने करणाऱ्या फूड टेक्नॉलॉजिस्टचं व्यवसाय क्षेत्र आज खूपच विस्तारलं आहे.



या उद्योगात उत्पादन आणि गुणवत्ता नियंत्रण असे दोन विभाग पडतात. फूड टेक्नॉलॉजिस्टना अन्नावरील प्रक्रिया करण्याच्या तसेच प्रिझर्व्हेशनच्या नवीन पद्धती शोधणे, प्रत्यक्ष प्रक्रिया करत असताना भेसळ होत नाही ना वा अन्नपदार्थ खराब होत नाही ना, याकडे लक्ष द्यावे लागते. तसेच कच्च्या मालाचा दर्जा तपासणे, विक्रीसाठी तयार मालाच्या नमुन्यांची चाचणी घेणे, पॅकिंग तपासणे, कारखान्यात आरोग्याच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेणे इत्यादी कामांचा समावेश होतो.

**कोण होणार?**

बी.एस्सी. (फूड टेक्नॉलॉजी/ फूड सायन्स) किंवा बी.ई./ बी.टेक. (फूड टेक्नॉलॉजी/ फूड सायन्स) आदी अभ्यासक्रमांसाठी १२ वी विज्ञान शाखेतून भौतिक शास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि इंग्रजी विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक असते.


# ब्लॅक डॉटचं रहस्य काय?

आयफोन वापरणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसतेय. काहीजण टिकाऊ म्हणून आयफोन वापरतात तर अनेकजण स्टेटस सिम्बॉल म्हणून आयफोनचा वापर करतात. दरम्यान, युजर्सना त्याबद्दलच्या अनेक गोष्टी माहिती नसतात. त्यातील एक म्हणजे आयफोनच्या मागच्या बाजूस कॅमेराजवळ असलेला ब्लॅक डॉट. हा ब्लॅक डॉट काय आहे? याबद्दल जाणून घेऊ या.

✻ नॉईस कॅन्सलेशन– हा मायक्रोफोन नॉइज कॅन्सलिंग तंत्रज्ञानाचा वापर करून अवांतर आवाज कमी करतो. त्यामुळे कॉल चालू असताना इतर आवाजांचा अडथळा येत नाही.

✻ लोकल ऑडिओ– या मायक्रोफोनमध्ये लोकल ऑडिओ नावाचे फिचर आहे. यामुळे आयफोनच्या स्पीकरमधील आवाज तुमच्या डोक्याभोवती थ्रीडी प्रभावामध्ये फिरतो. चित्रपट पाहताना किंवा म्युझिक ऐकताना खूप चांगला अनुभव येतो.

**माहीत आहे?**



✻ व्हिडिओ रेकॉर्डिंग– हा मायक्रोफोन व्हिडिओ रेकॉर्डिंग दरम्यान ऑडिओ कॅप्चर करण्यास मदत करतो. यामुळे उच्च दर्जाचा ऑडिओ मिळतो.

✻ व्हॉइस असिस्टंट– हा मायक्रोफोन 'हे सिरी' व्हॉईस असिस्टंट ॲक्टीव्ह करण्यातही महत्त्वाची भूमिका बजावतो.

# या ॲप्सबद्दल जाणून घ्या!

स्मार्टफोनवर सुरू असणाऱ्या सगळ्या ॲक्टिव्हिटीज रेकॉर्ड करता येतात. इतकंच नाही तर रेकॉर्ड केलेले सगळे व्हिडिओ सोशल मीडियावरही शेअर करता येतात. या ॲप्सचा वापर करून तुम्ही ट्युटोरियल्स बनवू शकता आणि यूट्यूबवर अपलोडही करु शकता. अर्थात यासाठी तुम्हाला काही ॲप्स डाउनलोड करावी लागतात.

✻ 'डीयू रेकॉर्डर' हे एक ॲप आहे. ते डाउनलोड करून तुम्ही फोनवरची कोणतीही ॲक्टिव्हिटी रेकॉर्ड करू शकता. या ॲपमध्ये व्हिडिओ एडिटिंगचं फीचर देण्यात आलं आहे. रेकॉर्ड केलेला व्हिडिओ एडिट करून सोशल मीडियावर शेअर करता येतो.

**ॲप वर्ल्ड**

✻ 'एझेड स्क्रीन रेकॉर्डर' या ॲपमुळेही व्हिडिओ रेकॉर्ड होतात. यात इतरही अनेक फीचर्स आहेत. हे ॲप वापरण्यासाठी तुम्हाला फोन रूट करावा लागणार नाही.




✻ 'एडीव्ही स्क्रीन रेकॉर्डर' हे ॲप अगदी सोप्या पद्धतीने वापरता येतं. या ॲपमुळे तुम्ही व्हिडिओ रेकॉर्ड करू शकता. यात वेगवेगळे फीचर्स देण्यात आले आहेत.

## ओळखा पाहू...

**जिज्ञासा**

१) चीनच्या उत्तर-पूर्व भागाला काय म्हणतात?
२) ब्रॅण्डनबर्ग गेट कोणत्या शहरात आहे?
३) न्यू ॲमस्टरडॅम या नावाने कोणतं शहर ओळखलं जात होतं?
४) बुटाच्या आकाराचा देश असं कोणत्या देशाला म्हटलं जातं?
५) इतैपू धरण कोणत्या नदीवर बांधण्यात आलं आहे?
६) सांताक्लॉजचं अधिकृत घर कुठे आहे?
७) चौकोनी आकाराचा झेंडा असलेला जगातला एकमेव देश कोणता?
८) महाराष्ट्रातलं सर्वात उंच शिखर कोणतं?
९) छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म कोणत्या किल्ल्यावर झाला?
१०) महाराष्ट्राचा राज्य प्राणी कोणता?

उत्तर : १) मंचुरिया २) बर्लिन ३) न्यूयॉर्क ४) इटली ५) पनामा (दक्षिण अमेरिका) ६) फिनलँड ७) स्वित्झर्लंड ८) कळसूबाई ९) शिवनेरी १०) शेकरू



# प्रिय डायरी...



कित्येकदा मनात दडलेली एखादी गोष्ट आपण कोणाला सांगू शकत नाही. अशा वेळी बरेच जण ती डायरीमध्ये लिहितात. दिवसभरात तुम्ही काय केलं, कोणत्या गोष्टी पूर्ण झाल्या, कोणत्या अपूर्ण राहिल्या, अशा गोष्टींची नोंद यात असते.त्याचबरोबरीने डायरीमध्ये इतरही खूप गोष्टी लिहून ठेवलेल्या असतात. मित्र-मैत्रिणींचे वाढदिवस, महत्त्वाच्या घटना घडलेल्या तारखा किंवा आणखी काही. पण, रोजच्या रोज डायरी लिहिण्याचे खूप फायदे आहेत. ते कसे?

✻ स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे व्यक्त करू शकाल– कधी-कधी इच्छा असूनही आपण मनातलं बोलत नाही. ही बोलणं तुम्ही डायरीमध्ये लिहून काढू शकता. जेणेकरून मनातल्या भावना अधिक चांगल्या पद्धतीने शेअर करू शकाल.

✻ गोष्टी लक्षात राहतील– शाळेमध्ये द्यायचा एखादा महत्त्वाचा प्रोजेक्ट, काही विशेष दिवस अनेकदा विसरायला होतात. अशा परिस्थितीमध्ये प्रत्येक लहान-मोठी गोष्ट डायरीमध्ये लिहून ठेवल्यामुळे गोष्टी लक्षात राहतील. डायरी पुन्हा वाचल्याने तुमची आठवण ताजी होईल.

**स्टडी टिप्स**

✻ भाषेवरची पकड मजबूत होईल– मोबाईल आणि लॅपटॉपच्या जगात आपण टाईप करताना शॉर्ट टर्म्स वापरतो. त्यामुळे अनेक वेळा आपण चुकीचे शब्द लिहू लागतो. अशा वेळी नियमित डायरी लिहिल्याने तुमची भाषेवरची पकड मजबूत होण्यासाठी मदत होईल.

✻ फोकस वाढेल– आपण अनेकदा खूप संकल्प करतो. काही ध्येय ठरवतो. पण अनेकदा आपण ती विसरून जातो. तुमची उद्दिष्टे डायरीमध्ये लिहिलीत, तर डायरी वाचाल तेव्हा तुम्हाला तुमचे ध्येय लक्षात येईल आणि त्यावर अधिक चांगल्या प्रकारे लक्ष केंद्रित करू शकाल.

✻ क्रिएटिव्हिटी वाढेल– डायरी लिहिण्याच्या सवयीमुळे क्रिएटीव्हीटी वाढण्यास मदत होते. यशस्वी करिअर करण्याकरता सातत्य आणि शिस्त फार महत्त्वाची असते. लिहिण्याच्या सवयीमुळे आयुष्यात काय करावं आणि काय करू नये याचे निर्णय घेण्यासाठी मदत होते.

**ठिपके जुळवा**



**दोस्त हे मस्त**

## कापसासारखा दिसणारा व्हेनेझ्युएलन

कापसासारखा दिसणाऱ्या या कीटकाचा शोध २००९ मध्ये लागला. व्हेनेझुएला देशातल्या ग्रॅन सबाना भागात हे जीव आढळतात. त्यांचा डोळ्यांचा भाग खूपच विचित्र आहे. जवळून पाहिलं तर तो एखाद्या सशासारखा भासतो. या कीटकाचा फोटो खूप लोकप्रिय झाला.



**खादाडी**

## आरोग्यदायी ॲपल मिल्कशेक

सफरचंद हे एक आरोग्यदायी फळ आहे. पण काहींना सफरचंद खायचा कंटाळा येतो. अशा वेळी तुम्ही ॲपल मिल्कशेक बनवू शकता. यासाठी एक मोठं किंवा दोन मध्यम आकाराची सफरचंद घ्या. दीड ते दोन कप थंड दूध, थोडीशी दालचिनी पूड, दोन चमचे साखर, १२ बदाम किंवा काजू, बर्फाचे तुकडे हे साहित्य घ्या.



आधी साल काढून सफरचंद कापून घ्या. नंतर छोटे तुकडे करून मिक्सरच्या भांड्यात घाला. त्यात दूध, साखर आणि सुका मेवा मिसळा. आता मिक्सरमध्ये नीट फिरवून घ्या. सफरचंदाचे तुकडे चांगले क्रश व्हायला हवेत. बर्फ घालून पुन्हा एकदा फिरवून घ्या. तयार ॲपल मिल्कशेक ग्लासमध्ये ओता. त्यावर दालचिनी पूड घाला.

**लाईफस्टाईल**

## वाढते प्रदूषण धोकादायक

मित्रमैत्रिणींनो, प्रदूषण हा सध्याचा ज्वलंत प्रश्न आहे. प्रदुषणामुळे अनेक समस्या निर्माण होतात. श्वसनासंबंधीचे विकार होऊ शकतात. इतकंच नव्हे तर खूप जास्त प्रदूषण असलेल्यास आपली विचार करण्याची क्षमताही कमी होऊ शकते असं एका संशोधनातून समोर आलं आहे. यावरून प्रदूषण किती धोकादायक असतं हे कळू शकेल.



**योगा टाईम**

## महाशक्ती मुद्रा

महाशक्ती मुद्रा अत्यंत उपयुक्त सिद्ध होते. यात दोन्ही हातांचे अंगठे मुठीत बंद करून घ्या. आता करंगळी आणि शेजारचं बोट सरळ करा. दोन्ही हाताच्या करंगळी आणि शेजारच्या बोटाचे पुढचे भाग एकमेकांना जोडून घ्या. पहिलं आणि मधलं बोट आतल्या बाजूला वळवा. ही मुद्रा दररोज १० ते १२ वेळा करायला हवी.



# कलासक्त

# आचार्य अत्रे

## ‘एको अहं द्वितीयो नास्ति न भुतो न भविष्यती’



**आचार्य अत्रे यांच्यावर लिहिणे म्हणजे अथांग सागरावर लिहिण्यासारखेच आहे. पुणे जिल्ह्यातील सासवडमधील अंत्यत निसर्गरम्य अशा कऱ्हा नदीच्या सानिध्यात वसलेल्या गावात आचार्य अत्रे यांचा जन्म झाला. बालपण अशा विलोभनीय निसर्गसंपन्न परिसरात गेल्यामुळे निसर्गावर प्रचंड प्रेम. म्हणूनच आचार्य अत्रे यांचे निसर्गलेखन वाचताना पदोपदी याचा प्रत्यय येतोच.**

**श्रीराम शेटये**

‘माझे नाव प्रल्हाद असले तरी आई मला बाबू म्हणायची. माझी आई फारशी शिकलेली नव्हती परंतु दिसायला फार सुंदर होती. माझे वडील रागीट स्वभावाचे असल्याने मी आई भोवतीच घुटमळत रहायचो. मी कोणत्याही क्षेत्रात गेलो तरी उच्च स्तरावर जावे अशी तिची ईच्छा होती. ती मला म्हणायची ,‘ बाबू आयुष्यात काहीही कर पण अधेमधे राहू नकोस. तळाला राहू नकोस नेहमी उच्च स्थानावर जा. कोणालाही घाबरू नकोस खुप कष्ट कर देवाची कृपा आणि आईचे आशिर्वाद नेहमी तुझ्या पाठीशी आहेत.’ तिचे हे शब्द आयुष्यभर माझ्या काळजात दरवळत राहिले.

ही आठवण आचार्य अत्रे यांनी आपल्या आईविषयी आदरपुर्वक सांगितली होती. आचार्य अत्रे आपल्या आईवडीलांविषयी बोलताना अंत्यत गंमतीशीर किस्सा सांगत असत.

तो असा आचार्य अत्रे यांचे आजोबा प्रात:विधीसाठी गेले होते. पूर्वीच्या काळी लोक नदीवर किंवा समुद्रावर प्रात:विधीसाठी जात असत. तो सन अठराव्या शतकातला काळ आहे. तर आजोबा प्रात:विधीसाठी त्या दिवशी थोडे लांबच गेले. अर्थात चालण्याच्या नादात गावाची वेस ओलांडुन बाजूच्याच गावात गेले. तेथे प्रात:विधी आटपून निघताना त्यांना ओळखीचे एक इसम भेटले. ते आजोबांना म्हणाले बाजूच्या गावात एक उत्तम उपवर मुलगी आहे ती तुमच्या मुलासाठी योग्य आहे.

बस एवढेच झाले तेव्हा नदीवर बाहेरच्या बाहेरच आंघोळ वगैरे आटपून त्या माणसासोबत आजोबा मुलगी बघायला सकाळीच यजमानांच्या घरी पोहचले. एवढ्या सकाळीच उपवर कन्यादेखील प्रात:विधीसाठी रवाना झाली होती. तिला निरोप धाडण्यात आला.

असे अचानक आपल्याला लग्नासाठी पाहायला येत आहेत. हे ऐकून मुलगीलाही काही सुचेना. तिने प्रात:विधी आटपून तिकडेच नदीवर आंघोळ केली आणि घरी येऊन नवऱ्या मुलाच्या वडीलांना सामोरी गेली.

तशातही हीच मुलगी आजोबांना सून म्हणून पसंत पडली. त्या काळात मुलामुलींची पसंती पाहात नसत. आई वडील पसंत करतील त्या जोडीदाराबरोबर विवाह करायचा अशी प्रथा होती.

अशा प्रकारे आचार्य अत्रे म्हणायचे माझा जन्मच विनोदात झालाय.

संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार, लेखक, कवी, संपादक, पत्रकार, हिंदी आणि मराठी चित्रपट पटकथा लेखक, दिग्दर्शक, निर्माते, नाटककार, प्रभावी राजकारणी, शिक्षणतज्ञ, फर्डे वक्ते अशा अनेक क्षेत्रात अग्रेसर असलेले आचार्य अत्रे म्हणजे असामान्य अद्‌भुत व्यक्तिमत्व होते.

आचार्य अत्रे यांच्यावर लिहिणे म्हणजे अथांग सागरावर लिहिण्यासारखेच आहे. पुणे जिल्ह्यातील सासवडमधील अंत्यत निसर्गरम्य अशा कऱ्हा नदीच्या सानिध्यात वसलेल्या गावात आचार्य अत्रे यांचा जन्म झाला. बालपण अशा विलोभनीय निसर्गसंपन्न परिसरात गेल्यामुळे निसर्गावर प्रचंड प्रेम. म्हणूनच आचार्य अत्रे यांचे निसर्गलेखन वाचताना पदोपदी याचा प्रत्यय येतोच. स्वातंत्र्यवीर सावरकर सोडले तर इतके सुंदर निसर्गलेखन दहा हजार वर्षात कोणी केले नाही असे मी आचार्य अत्र्यांच्या शब्दात म्हणेन. पण नाटककार वक्ते राजकारणी म्हणून किंवा ते ज्या क्षेत्रात होते तेथे त्यांची उंची गाठणारा कोणी दुसरा झाला नाही. ‘एको अहं द्वितीयो नास्ति न भुतो न भविष्यती’ असेच त्यांच्याबद्दल म्हणावे लागेल.

आचार्य अत्रे आपल्या यशाचे आणि संस्कारांचे श्रेय आपल्या आईला देतात. आईच्या माहेरी नाटक, संगीत, सतारवादन आदी कलांचा वारसा होता. तोच वारसा आचार्य अत्रे यांना लाभला.

सासवडसारख्या सामान्य खेड्यातून आलेला एक सर्वसामान्य घरातला मुलगा बी. ए. होतो, बी. टी. होतो. त्या काळात शिक्षक होण्यासाठी लागणारी मानाची टी. डी. ही पदवी मिळवण्यासाठी लंडनला जातो.

‘शामची आई’ चित्रपट बनविला तेव्हा आचार्य अत्रे यांच्या खिशात एक दमडीही नव्हती. चित्रपट बनविण्याचे कोणतेही विशेष ज्ञान घेतले नव्हते. तरीही चित्रपट बनविला तो सुपरहीट झाला. चित्रपटाला पहिला राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते मिळाला. मराठा वर्तमानपत्र काढले तेव्हाही त्यांच्या हातात पैसा नव्हता. आचार्य अत्र्यांनी महाराष्ट्राच्या जनतेसमोर झोळी पसरली आणि लोकांनीं भरभरून निधी दिला. इतका की आचार्य अत्र्यांची झोळी छोटी पडली.

आचार्य अत्रे या सर्व यशाचे श्रेय आपल्या आईला देतात. आचार्य अत्रे जेव्हा लंडनहून शिकून टी.डी. पदवी घेऊन भारतात आले. तेव्हा त्यांनी मुंबईत शिक्षकाची नोकरी पत्करली. मुंबईतल्या खानवळीचे अन्न मानवेना तेव्हा अत्रे आपल्या आईला घेऊन मुंबईला आले.

तेव्हा आई म्हणाली ,‘बाबू तुझ्यामुळे मला मुंबई दिसली. नाहीतर माझा सासवडचा संसार काही सुटला नसता.’छत्रपती शिवाजी महाराजांना जशी प्रेरणा आईकडून मिळाली तशीच प्रेरणा आचार्य अत्रे यांना मिळाली. ते ज्या ज्या क्षेत्रात गेले तेथे सर्वोतम राहिले. असे कोणतेच क्षेत्र नव्हते जेथे त्यांनी आपली छाप उमटवली नाही.







शिक्षकाच्या नोकरी पासून सुरू झालेला त्यांचा प्रवास लेखक, कवी, नाटककार, चित्रपट, राजकारण ते संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार असा चढत्या आलेखाने झाला. जंगलात शिकार करणाऱ्या सिंहाला पहावे, क्रिकेटच्या मैदानात तळपणारी बॅट घेतलेल्या सचिन तेंडुलकरला पहावे आणि संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात प्रचंड जनसमुदायासमोर झंझावाती भाषण करणाऱ्या आचार्य अत्र्यांना पहावे.

त्यांचे वक्तृत्व त्यांचे कर्तृत्व पाहिले तर आजही आपण भारावून जातो. त्यांची मोरूची मावशी, तो मी नव्हेच, लग्नाची बेडी, ब्रम्हचारी यासारखी नाटके थिएटरमध्ये आजही तुफान चालतात. खरतर अत्यंत दर्जेदार अशी संगीत नाटके काळाच्या ओघात गडप झाली. परंतु आचार्य अत्रे यांचे लेखन आणि नाटके अजरामर झाली.

आचार्य अत्रे यांनी अंधारात असणाऱ्या अनेक कलावंताना पडद्यावर आणले.

पुण्याला आगरकर हायस्कुलमध्ये शिक्षिक असताना वनमाला बाई नावाच्या एका शिक्षिकेशी त्यांची ओळख झाली. ओळखीचे रूपांतर पुढे घट्ट मैत्रीत झाले. वनमालाबाई विवाहीत होत्या. परंतु त्यांच्यातील कलागुण आचार्य अत्रे यांच्या नजरेत आले.

आचार्य अत्रे यांनी वनमाला बाईंना व्ही शांताराम, मास्टर विनायक यांच्याकडे शिफारस करून पाठविले. सुरूवातीला वनमाला बाईंना चित्रपटात काम करण्यात रस नव्हता. परंतु संधी मिळाल्यावर वनमाला बाई मराठी आणि हिंदी चित्रपटात स्टार बनल्या. पुढे आचार्य अत्रे यांच्या ‘शामची आई’ या चित्रपटात त्यांनी काम केले. त्या चित्रपटाला पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करताना तत्कालीन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण आचार्य अत्र्यांना आदराने फायटर आणि रायटर आचार्य अत्रे असे म्हणाले होते. आचार्य अत्रे यांचा दुसरा एक किस्सा अंत्यत गौरवशाली आहे. एक दिवस आचार्य अत्रे आपल्या दैनिक मराठाच्या कार्यालयात बसले होते. एवढ्यात सुप्रसिध्द कवी सोपानदेव चौधरी त्यांना भेटायला आले. सोपानदेव चौधरी यांच्या हातात एका कापडी पिशवी होती त्यात काही दस्ताऐवज होते. सोपानदेव चौधरी आचार्य अत्रे यांना म्हणाले ‘माझी आई कवीता म्हणायची. ती अशिक्षीत होती परंतु मी तिच्या काही कविता लिहून ठेवल्या आहेत. कृपया आपण त्या पाहता का?’

आचार्य अत्रे यांनी पिशवी उघडली आणि कविता वाचू लागले. ते म्हणाले, ‘अरे सोपान हा तर खजिना आहे. इतके दिवस कुठे लपवून ठेवला होतास.तो सोपानदेव चौधरी म्हणजेच बहिणाबाई चौधरी यांचा मुलगा. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईच्या या कविता प्रकाशित केल्या. अशाप्रकारे मरणानंतर कवयित्री बहिणाबाईंच्या कविता प्रसिद्ध झाल्या.आचार्य अत्रे यांच्या नजरेस पडल्या नसत्या तर कवयित्री बहिणाबाईसारख्या एक संत कवयित्रीच्या कविता अंधारात राहिल्या असत्या. महाराष्ट्राला बहीणाबाईंची ओळख आचार्य अत्र्यांच्या प्रयत्नातूनच झाली.

**

## मराठी पाऊल पडते पुढे

# तमिळींच्या स्वयंपाकगृहात मालवणी खाद्यपदार्थ!



**चैतन्य खाद्यगृहाच्या सुरेखा वाळके आणि नितीन वाळके, सायली वाळके, शेफ प्रथमेश कुलकर्णी यांचा सहभाग!**

**चेन्नईत मालवणी पदार्थांचा पंचतारांकित महोत्सव संपन्न!**

**राम कोंडीलकर**

चेन्नई, अण्णा सलाई (सां. प्र.) आपल्याला मुंबई - महाराष्ट्रात जगभरातील खाद्यपदार्थांची रेलचेल पाहण्यास मिळते. अनेक खाद्य-संस्कृती, परंपरा आपण स्वीकारत असल्याने जिभेवर रेंगाळणारे अद्भुत चवदार पदार्थ महाराष्ट्रात उपलब्ध होत असतात. परंतु आपले मराठमोळे खाद्य पदार्थ इतर राज्यात अभावानेच चाखायला मिळतात. नुकताच तमिळनाडूतील ‘रेन ट्री’ या चेन्नईतील प्रसिद्ध पंचतारांकित रेस्तराँमध्ये आपल्या मालवणी खाद्यपदार्थांचा ७ दिवसांचा खाद्यमहोत्सव आयोजित करून महाराष्ट्राच्या खाद्यसंस्कृतीचा सन्मान केला आहे. महाराष्ट्रासाठी आणि खासकरून कोकण-मालवणसाठी अभिमानाची गोष्ट असून मुंबई - मालवण येथील 'चैतन्य' या अस्सल मालवणी खाद्यगृहाच्या सुरेखा वाळके आणि नितीन वाळके, सायली वाळके, प्रथमेश कुलकर्णी यांना हे श्रेय जाते. मालवणी खाद्य पदार्थांचा नुसता महोत्सव न करता आपले पदार्थ कसे बनवावेत? आणि कसे सर्व्ह करावेत? याचे प्रशिक्षणही तेथील प्रशिक्षित शेफना देऊन ते तमिळींना मालवणी पदार्थांचा लळा लावण्यात यशस्वी झाले आहेत.

मालवण ते मुंबई असा प्रवास करत घरगुती जेवणाला अस्सल मालवणी ते अशी ओळख निर्माण करण्यापर्यंतची मजल सुरेखा वाळके आणि नितीन वाळके या खाद्यप्रेमी दाम्पत्याने मारत 'चैतन्य'ची ३० वर्षांपूर्वी स्थापना केली. आज यात एक नाविन्यपूर्ण गोष्टीची भर पडली आहे. चेन्नईच्या ‘रेन ट्री’ हॉटेलमध्ये तमिळ खाद्य प्रेमींसाठी आपल्या अस्सल चवीच्या मालवणी खाद्य पदार्थांच्या खास रेसिपी या महोत्सवात चैतन्य ग्रुपच्या वाळके परिवाराने सादर तर केल्याच परंतु तेथील प्रशिक्षित शेफना आपले पदार्थ तयार करण्याचे प्रशिक्षणही दिले. एक आठवडाभर संपन्न झालेल्या या महोत्सवाला खाद्यप्रेमींनी भरभरून प्रतिसाद दिला. तमिळींनी नुसते आपले खाद्य पदार्थच स्वीकारली असे नसून त्यांनी आपल्या संस्कृती आणि परंपरेबद्दलही कमालीचा आदर असल्याचे दिसून आले.



या सध्या सुरु असलेल्या सात दिवसांच्या या मालवणी खाद्य महोत्सवामध्ये - पद्धतीच्या कार्यक्रमात सेट मेनू म्हणजेच थाळी व बुफे अशा दोन्ही तऱ्हेने चेन्नईचे खाद्य रसिक मालवणी जेवणाचा आस्वाद घेत होते. मालवणी मसाल्यातील बटाटे वडे ते ओल्या काजूची उसळ, कुळथाची पिठी ते माश्याच तिखलं, आमटी, भाजलेले मासे, भरलेले पापलेट, कोळंबी भात ते चिकन सागोती, वडे, भाकरी आणि मालवणी जेवणाची भैरवी सोलकढी अशी रेलचेल असलेलं चविष्ट पदार्थ खाऊन ते तृप्त झाले. तमिळी अस्सल खवय्यांचा मिळालेला प्रतिसाद मालवणी खाद्यपदार्थांचा लौकिकार्थाने सन्मान वाढवत असून परराज्यातील खवय्यांना तृप्त करण्याची ‘चैतन्य’ला संधी प्राप्त झाली हा अनुभव परकाया प्रवेशासारखा होता असे सुरेखा वाळके सांगतात.

**

कविता

# ‘कान्हा बालक’

**‘कृष्णगान’**

**शशिकांत मुद्देबिहाळकर**

९७६७१५२६०८

तू सानूला, चिमुकला, असा राघू माझा जणू सर्वस्वाचा खजिनाच आहेस, असे कवीने बाल्यावस्थेतील कृष्णाचे वर्णन केले आहे. माझ्या मनातील साऱ्या चिंतांचे हरण करण्यासाठीच या धरतीवरती तू आला आहेस असे कवी त्या छोट्या रुपातील कृष्णाला उद्देशून म्हणतो. माझा देह उजळण्यासाठी,तू जणू अमृत झालायस, असे म्हणून माझ्यासाठी तू म्हणजे जणू सोन्याचा सजीव पुतळाच घडविण्यात आलाय असे म्हणून कवी कृष्णाला लडीवाळपणे दुडू दुडू माझ्या जवळ येना! मला तूला माझ्या बाहूत घेण्याची आंस लागलीय अशी, बाल कृष्णाला विनवणी करतो. पुढे, तू धावत माझ्याजवळ येताच माझी तनु जणू रोमांचित होते असे कवी सांगतो. अर्थात तू थोडाही दूर होऊ नकोस कारण तू जरासाही दूर झालास तर माझे मन धाव घेईल तुझ्याकडे तुझ्या कपाळाचे चुंबन घेण्यासाठी, माझा ऊर भरून येईल अभिमानाने तूझे कौतुक ऐकून, आणि गात्रे पुलकीत होतील तुझ्या गालीचे चुंबन घेऊन, मी धुंद होऊन जाईन तूला छातीशी घट्ट धरून, माझे मन वेडे पिसे होऊन जाईल तुझ्या गालाचा बदललेला रक्तिमा पाहून.

पण एक सल अंतरी ऊठते कवीच्या, त्या बाल्यावस्थेतील कृष्णाच्या भाळावर दिसलेली चिंता पाहून, उरात धडधड होते, त्याच्या डोळ्यातील अश्रु पाहून, हृदयातील रक्त ऊसळून निघते, डोळ्यांवरचा विश्वास उडतो, तो तूच आहेस ना या शंकेने कवी व्याकूळ होतो.




माझं सारे जीवन हे तर तूच आहेस ना अशी विचारणा कवीने त्या व्याकूळ मनस्थितीत केली आहे. कृष्णाचे बोबडे बोल ऐकून मात्र कवीची ती सल हरवून जाते. ते मधूर हास्य आणि त्या वेळी दिसणाऱ्या शुभ्र दंतपक्ती पाहून कवींच्या मनीचा क्रोध काहीसा शांत होतो. ईश्वरासही न जमलेला त्या बाललिलांनी केलेल्या प्रेमाच्या वर्षावाने कवी आनंदीत होतो. कृष्णासारखा हिरा गवसल्याचा परमानंद कवीला झालेला आहे. आता याहून जीवनी कोणतेच सुख उरलेले नाही अशी कवीची भावना असते. हा चिमुकला, सानूला, राघू हेच कवीचे सर्वस्व आहे, जीवनाचा अनमोल खजिना आहे अशी कवीची तरल भावना या कवितेतून भक्तिरसात ओथंबून व्यक्त होते.

**(कवि. प्रा. श्रीप्रकाश अधिकारी)****

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)